# विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था

# आदर्श उपविधी

**सन 2013 चा अध्यादेश क्रमांक 2 च्या अनुषंगाने विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांची आदर्श उपविधी**

**1. संस्थेचे नाव व पत्ता**

**(1)** संस्थेचे **नाव व पत्ता** ------------------------------------------

**(2) नोंदणी क्रमांक व दिनांक** -------------------------------------------

**(3) संस्थेचे कार्यक्षेत्र** ----------------------------------------- **पुरते मर्यादित राहील.**

संस्थेच्या कार्यक्षेत्रात अशाच प्रकारची संस्था नव्याने स्थापन झाल्यास अशा नविन संस्थेचे कार्यक्षेत्र अस्तित्वात असलेल्या संस्थेच्या कार्यक्षेत्रातुन आपोआप वगळले जाईल.

**(4) पत्त्यातील बदल**

उपविधीत नोंदलेला संस्थेच्या पत्त्यातील बदल लेखी लिहून संस्थेची नोंदणी करणारे अधिकारी यांना नियम 31 मधील तरतूदीप्रमाणे कळविले जाईल. पत्त्यात बदल झाल्यापासून तीस दिवसांचे आत तो बदल अधिनियमाचे कलम 37 व नियम 31 मधील तरतूदींनुसार

त्यांना कळविला जाईल. नियमानुसार उपविधीत पत्त्याची दुरुस्ती केल्याशिवाय तो बदल नोंदला असे समजण्यात येणार नाही.

## 2. संस्था वर्गीकरण आणि उपवर्गीकरण

(1) **संस्थेचे** मुख्य वर्गीकरण ' **साधन संपत्ती संस्था** ' असे राहील व उपवर्गीकरण ' **सेवा साधन संपत्ती संस्था** ' असे राहील.

(2) **संबधित निबंधकाच्या मान्यतेने** संस्थेस आपल्या कार्यक्षेत्रात आपल्या शाखा सुरु करता येतील व तसे त्यांचे पत्ते व त्यात झालेले बदल उपविधी क्रमांक 1 मध्ये नमूद केल्याप्रमाणे वेळोवेळी कळविले जातील.

(3) **संस्थेचे** आर्थिक वर्ष 1 एप्रिल रोजी सुरु होईल व येणा-या 31 मार्च रोजी संपेल.

(4) **संस्थेचे** कार्य व कामकाज राज्य शासन किंवा राज्यशासनाच्या पूर्व मंजूरीने मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे हे वेळोवेळी निर्गमित करतील अशा धोरणविषयक निर्देशानुसार चालेल.

(5) संस्थेचे काम, तिचे उपविधी, अधिनियम व नियम यांचे संस्थेकडून योग्य रितीने पालन होते किंवा नाही, कागदपत्रे आणि हिशोब पुस्तके योग्य नमुन्यात ठेवली आहेत काय, संस्थेचा कारभार सुयोग्य तत्त्वानुसार चालतो काय, संस्था सहकारी तत्वाचे, सहकार कायदा आणि इतर सर्व संबंधित अधिनियमांच्या तरतूदीनुसार आणि त्या अन्वये तयार करण्यात आलेल्या नियमांनुसार, राज्य सरकारने दिलेल्या निर्देशक तत्त्वांचे आणि निर्देशांचे पालन करत आहे याची खात्री करुन घेण्यासाठी नोंदणी अधिकारी यांनी अगर त्यांनी अधिकृत केलेल्या व्यक्तीने संस्थेच्या कामकाजाची तपासणी करणे हे कायदेशीर

असेल. संस्थेवर देखरेख करण्याच्या कामासाठी नोंदणी अधिकारी यांना पुढील अधिकार असतील-

**(अ) संस्थेची** कागदपत्रे व हिशोब पुस्तके यांची तपासणी करण्यासाठी नोंदणी अधिकारी यांना कोणत्याही वेळी ती पहावयास मिळतील.

**(ब) कागदपत्रे,** पुस्तके ताब्यात असणा-या संस्थेच्या कोणत्याही अधिका-यास व कर्मचा-यास आपणांपुढे ती हजर करण्यासाठी बोलावून घेता येतील.

## 3. व्याख्या

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम 1961 मधील तरतुदींचे अधिनतेने,या उपविधीत,-**

**(1)** "अधिनियम", "नियम" व "उपविधी" म्हणजे अनुक्रमे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम 1961 व संस्थेचे अधिनियमाप्रमाणे नोंदलेले उपविधी होय.

**(2)** "शासन " म्हणजे महाराष्ट्र शासन

**(3)** "निबंध " म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 च्या तरतूदीनुसार नेमण्यात आलेला सहकारी संस्थांचा निबंधक

**(4)** "सभासद" म्हणजे संस्थेच्या नोंदणीसाठी करण्यात आलेल्या अर्जात सहभागी होणारी व्यक्ती अथवा नोंदणीनंतर ज्याने सभासदत्व स्वीकारले आहे अशी व्यक्ती

(5) “सहकारी पतसंरचना” मध्ये प्राथमिक सहकारी कृषी पतसंस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व राज्य सहकारी बँक यांचा समावेश होतो.

(6) “सहकार वर्ष ” म्हणजे दिनांक 1 एप्रिल ते दिनांक 31 मार्च रोजी संपणारे वर्ष

(7) “सचिव” म्हणजे संस्थेच्या दैनंदिन कामकाजाचे व्यवस्थापन पहाण्यासाठी सचिव म्हणून नेमलेला सेवक.

(8) “पदाधिकारी” म्हणजे संस्थेच्या उपविधीस अनुसरुन संस्थेच्या संचालक मंडळावर निवडणुकीने किंवा नेमणुकीने आलेली व्यक्ती

(9) “राष्ट्रीय बँका” याचा अर्थ राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक अधिनियम 1981 याच्या तरतुदीनुसार स्थापन करण्यात आलेली राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बॅंक (नाबार्ड) असा आहे.

(10) “सेवक” म्हणजे संस्थेचे कामकाज पार पाडण्यासाठी नेमलेली पगारी व्यक्ती

(11) “संघीय संस्था” म्हणजे संस्था ज्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेशी संलग्न होईल ती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक

(12) “वित्तीय संस्था” म्हणजे भारतीय रिझर्व बँक व नाबार्ड यांच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या अधिन असलेली व भारतीय रिझर्व बँकेने विनियमित केलेल्या अशा वित्तीय संस्थेकडून संस्था कर्ज घेईल अशी वित्तीय संस्था

(13) “समिती” म्हणजे संस्थेच्या कामकाजाची व्यवस्था ज्या व्यवस्थापन समितीकडे किंवा अन्य निर्देशित मंडळाकडे सोपविण्यात आली असेल ती समिती किंवा मंडळ होय.

**(14)** “संस्था” म्हणजे प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था/विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था / आदिवासी विकास सेवा सहकारी संस्था होय.

**(15)** “ कार्यलक्षी संचालक” म्हणजे संस्थेचा सचिव

**(16)** “क्रियाशिल सभासद” म्हणजे संस्थेच्या कामकाजामध्ये सहभाग घेणारा आणि संस्थेने पुरविलेल्या सेवांचा अथवा साधनांचा या उपविधीत नमुद केल्याप्रमाणे किमान मर्यादित उपभोग घेणारा भागधारक सभासद.

17) “तज्ञ संचालक” म्हणजे समीतीने समीती सदस्य म्हणुन नियुक्त अथवा स्विकृत केलेला बँकिंग वित्तव्यवस्था, व्यवस्थापन या क्षेत्रांमधील अनुभव असलेला सदस्य आणि त्यामध्ये संस्थेच्या उद्देश आणि कार्ये यांचेशी संबंधीत अन्य कोणत्याही क्षेत्रातील विशेषज्ञता धारण करणा-या क्रियाशील सभासदाचा समावेश होतो.

## 4. उद्देश

**संस्थेचे उद्देश खालीलप्रमाणे असतील-**

**(1)** सदस्यांमध्ये काटकसर, स्वावलंबन व सहकार यांचा प्रसार होण्यास उत्तेजन देणे.

**(2)** सदस्यांमध्ये मुख्यत: शेतकीविषयक गरजा भागविण्याकरिता माफक व्याजाच्या दराने त्यांना अल्प, मध्यम तसेच दीर्घ मुदतीने कर्जाऊ रकमा देण्यासाठी उपविधी क्रमांक 5 मध्ये नमूद केलेल्या साधनांचे द्वारा भांडवल जमविणे.

(3) संस्थेच्या सदस्यांच्या वतीने शेतकीविषयक (उदा.सुधारलेली बी-बीयाणे,खते,चारा इत्यादी) तसेच घरगुती आणि जीवनोपयोगी वस्तूंची खरेदी, वाटप करण्याकरिता अभिकर्ता (एजंट) म्हणून काम करणे.

**(4)** सदस्यांच्या वतीने शेतीची औजारे, यंत्रे, तेल वगैरे खरेदी करणे व त्यांना पुरविणे.

**(5)** सदस्यांच्या शेतीचा माल साठविण्याकरिता गोदामे बांधणे, ती खरेदी करणे अगर भाडयाने घेणे

व ती भाडयाने देणे.

**(6)** शेतीमालाच्या तारणावर आगाऊ रकमा (ॲडव्हान्सेस) देणे.

**(7)** संस्थेच्या सदस्यांचा शेतीमाल गोळा करणे, त्याच्या वाहतुकीची व्यवस्था करणे व सहकारी तालुका खरेदी विक्री संस्थेमार्फत त्याच्या विक्रीची व्यवस्था करणे, तशी नसेल तर स्वत: होऊन अगर अन्य सहकारी संस्थांमार्फत व्यवस्था करणे.

**(8)** बाजार समिती च्या प्रचलित कायद्यान्वये व त्याखालील नियमानुसार संस्थेमार्फत बाजार व्यवस्था उभारणे, शिवार खरेदी करणे अथवा तदनुषंगिक कामे करणे.

**(9)** सदस्यांसाठी धान्य भांडार (ग्रेन डेपो) व ग्राहक भांडार चालविणे.

**(10)** **शेतकी** व इतर तत्सम धंद्यामधील (उदा.दुग्धव्यवसाय,कुक्कुटपालन इत्यादी) नवीन सुधारणाविषयक ज्ञानाचा सदस्यामध्ये प्रसार करणे, त्या सुधारणा अंमलात आणण्याकरिता सदस्यांना उत्तेजन देणे.

**(11)** सदस्यांना जनावरांच्या पैदाशीसाठी व त्यांच्या संवर्धनासाठी कर्जपुरवठा करणे

**(12)** वरील क्रमांक **(1)** ते **(11)** मध्ये नमूद केलेल्या उद्देशांच्या पूर्ततेसाठी जरुर पडणारी इतर कामे हाती घेणे.

**(13)** **सभासदांना** नाबार्डच्या मार्गदर्शक सुचनांनुसार वित्तीय संस्थेकडुन अल्प, मध्यम मुदत व दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा संचालक मंडळाने तयार व मंजुर केलेल्या आणि

**संस्थेच्या सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या** धोरणानुसार खालील प्रमाणे उपलब्ध करता येईल-

अ) शेतघर व गोठा संलग्न गोबर गॅस बांधण्याकरिता कर्जपुरवठा करणे

ब) कुक्कुट पालनासाठी दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करणे

क) फळबागासाठी दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करणे.

ड) गाई व म्हैस यांकरिता मध्यम मुदत कर्जपुरवठा करणे

इ) निवासी घर व शेतघर याकरिता दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करणे.

ई) दुग्धव्यवसायाकरिता मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा करणे.

त्याचबरोबर बँक धोरणात वेळोवेळी होणा-या बदलाप्रमाणे कर्जाच्या योजना सभासदांच्या हिताकरिता राबविण्याच्या व त्याप्रमाणे कर्जपुरवठा करण्याचा अधिकार संस्थेस राहील. त्यात परत पोटनियम दुरुस्ती करण्याची आवश्यकता असणार नाही.

**(14)** **इतर** उपविधीत काहीही नमूद केले असले तरी, सदस्यांची व त्यानुषंगाने जनतेचे राहणीमान, उद्योगधंदे व उत्पादन पध्दती यांत सुधारणा घडवून आणण्यासाठी **संस्थेच्या सर्वसाधारण सभेने** संमत केलेल्या नियमांनुसार व वित्तीय संस्था वेळोवेळी घालतील त्या अटी व मर्यादांनुसार खाली नमूद केलेले अगर इतर कोणतेही व्यवसाय संस्थेच्या समितीस हाती घेता येतील अगर अशा व्यवसायांना भांडवल पुरवता येईल-

**1) कारागिरांसाठी** स्वतंत्र संस्था अस्तित्वात येईपर्यंत त्यांच्यासाठी पुढील कामे करणे -

अ. घरगुती व इतर लहानसहान उद्योगधंदे सुरु करण्यास उत्तेजन देणे.

ब. कर्जपुरवठा करणे व त्याची वसुली करणे.

क. त्यांच्या वतीने अभिकर्ता या नात्याने त्यांना लागणारा कच्चा माल मिळविणे व त्याचे वाटप करणे.

ड. तयार केलेल्या मालाच्या वाहतुकीची व विक्रीची व्यवस्था करणे.

**2)** अभिकर्ता या नात्याने गि-हाईकांना (सदस्यांना व बिगर सदस्यांना) लागणारा शेतीविषयक माल,धान्य अगर वस्तू मिळविणे व त्यांचे वाटप करणे.

**3)** जरुर तेव्हा वाजवी खर्चात सरकारसाठी धान्य गोळा करणे व ते पुरविणे

**4)** दुर्बल घटकांतील सदस्यांना खावटीसाठी व अन्य घरगुती कारणांसाठी समितीने तयार केलेल्या व **संस्थेच्या सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या** व वित्तीय संस्थेच्या नियमांनुसार कर्जे देणे.

**5)** **भूमिहीन** मजूरांच्या गरजा भागविण्यासाठी पुढील कामे हाती घेता येतील-

अ. गावातील शिल्लकी जमीन मिळवून ती अशा मजूरांकरवी सामुदायिकरीत्या लागवडीखाली आणणे.

ब. सदस्यांच्या अगर गावक-यांच्या सुखसोयीसाठी गावची व सार्वजनिक कामे (उदा.रस्ता,इमारती, पूल, गटारे विहीरी,जमीन सुधारणे इत्यादी ) मक्ता (कॉन्ट्रॅक्ट) पध्दतीने काम करुन देणे.

क. संस्थेच्या **सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या**—धोरणास अनुसरून एकात्मिक योजनेखाली अगर प्रकल्पासाठी एखाद्या क्षेत्रात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने

अथवा वित्तीय संस्थेने पुनविर्कास मंजूर केल्यास आपल्या सभासदांना मध्यम व दीर्घ मुदतीचा कर्ज पुरवठा सभासदांच्या मागणीप्रमाणे करणे.

वरील क्रमांक 4.14 ते 4.14.5 यात नमूद केलेल्या उद्देशांच्या पूर्ततेसाठी जरुर असणारी इतर कामे हाती घेणे.

**15).** सदस्यांच्या शेती उत्पादन वाढीकरिता जमीनसुधारणा,पाणीपुरवठा, पीकनियोजन व पीक संरक्षण इत्यादी योजना हाती घेणे.

16) सभासदांचेसाठी दळण कांडप विभाग,पशुखादय विभाग,गांडुळ खत , सेंद्रिय खत निर्मिती, गॅस वितरण अभिकर्ता, पेट्रोल व गॅस पंप इत्यादी विभाग चालविणे.

17) पाण लोट विकास, वृक्ष लागवड, रोप वाटीका निर्मिती, जलसंधारण व पर्यावरण समतोल इत्यादी कामे पार पाडणे व त्यासाठी अशासकिय संस्था म्हणून कामकाज करणे.

18) सभासदांसाठी तसेच पिक विम्यासाठी व जनावरांच्या विम्यासाठी एल.आय.सी/ जी.आय.सी अथवा इतर मान्यताप्राप्त विमा कंपनीसाठी विमा अभिकर्ता म्हणून कामकाज पहाणे.

19) केंद्र शासन , राज्य शासन,नाबार्ड, महाराष्ट्र राज्य को-ऑप बँक,पणन मंडळ,कृषि उत्पन्न बाजार समिती,जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अथवा वित्तीय संस्था यांनी वेळोवेळी आखलेल्या योजना राबविणे.

20) परंपरागत शेती, सेद्रिय शेती, मिश्र पीक पध्दती,गांडूळ खत,बियांचे स्थानिक वाण जपणे, पशुधनाचे स्थनिक जाती जपणे, इत्यादीसाठी कामे करणे.

21) सदस्यांना जमीन सुधारण्यासाठी सरकारकडुन,जिल्हा बँकेकडून व कृषि व ग्रामिण विकास बँकेकडून तसेच राष्ट्रीयकृत बँकेकडून अथवा वित्तीय संस्थेकडुन कर्ज मिळवून देणे,

22) सभासदांच्या कुटूंबातील मयत व्यक्तींचे अंत्यसंस्कारासाठी कर्ज, पाल्याचे शिक्षणासाठी, घर बांधणी,शौचालय बांधणे, वाहन खरेदी , सायकल खरेदी,सौर बंब, सौर उर्जेवर चालणारी घरगुती उपकरणे खरेदी , संगणक, टि.व्ही. खरेदी, सोने अलंकार खरेदी इ. साठी कर्ज पुरवठा करणे.

23) स्वयंसहाय्यता गट स्थापन करणे व त्यांना कर्ज पुरवठा करणे त्यांचे संवर्धन व पालकत्व करणे.

24) सदस्यांच्या उत्पादन वाढीकरता जमीन सुधारणा,पाणी पुरवठा, पाणी वापर, पीक नियोजन व पीक संरक्षण,शेत तळे, बोअर वेल(कुपनलिका), मत्स्य व्यवसाय, कुक्कुटपालन व विहिर इ.योजना हाती घेणे.

25) कर्ज पुरवठा करणा-या राष्ट्रीयकृत बँका, वित्तीय संस्था, सहकारी साखर कारखाने, जिल्हा कृषी व ग्रामिण विकास बँक, पाणी पुरवठा संस्था व इतर सहकारी संस्थाचे वसुलीचे कामकाज करार पध्दतीने किमान 2 टक्के मोबदला घेऊन करणे.

26) महाराष्ट्र शासनाच्या वतीने संबंधित विभागाच्या परवानगीने कार्यक्षेत्रातील शेतक-यांचा महसुल गोळा करणे व तो महसुल खात्याकडे वर्ग करणे.

27) अ) महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीचे एजंट म्हणुन कामकाज करणे त्यांच्या वतीने विज बिले गोळा करणे, विज वितरण करणे व अनुषंगिक कामे करणे.

ब) भारत संचार निगम अथवा इतर दुरध्वनी अथवा भ्रमणध्वनी सेवा पुरविणा-या कंपनीचे एजंट अथवा वितरक म्हणुन कामकाज करणे त्यांच्या वतीने बिले गोळा करणे, वितरण करणे व अनुषंगीक कामे करणे.

28) सभासदांना पाणी पुरवठाकरणा-या सहकारी संस्थेला आणि अथवा पाणी पुरवठा करणा-या एजन्सीला पाणी पट्टी सभासदांच्या वतीने लेखी पुर्वसंमतीने भरणे, उद्देशाच्या पुर्ततेसाठी जरुर असणारे इतर काम हाती घेणे.

29) बँकिंग बिझनेस करस्पाँडंट अथवा फ्रॅन्चाइजी म्हणुन संस्थेच्या कार्यक्षेत्रात कामकाज पहाणे.

30) भारतीय रिझर्व्ह बँके चा वित्तीय साक्षरता (Financial Literacy) उपक्रम हाती घेणे.

## 5. निधींची उभारणी व गुंतवणुक

**अ)** संस्थेचा निधी खाली उल्लेखिलेल्या पैकी एक अगर एकाहून अधिक मार्गाचा अवलंब करुन उभारता येईल-

**(1)** **भागाच्या रुपाने** अ) सदस्यांकडून (सभासदांकडून जास्तीत जास्त रु.20,000/- पर्यंत भाग कपात करता येईल) ब) सरकारकडून (एकूण वसुल भागभांडवलाच्या 25% पेक्षा जास्त नाही) क) इतर सहकारी संस्थांकडुन ड) वित्तीय संस्थेकडुन

**(2)** **ठेवींच्या रुपाने - 1)** सदस्यांकडून 2) बिगर सदस्यांकडून 3) इतर सहकारी संस्थांकडुन

4) स्वयं सहायता गटाकडून

**(3)** **कर्जाच्या रुपाने** - वित्तीय संस्थेकडून

**(4)** **देणगीच्या** रुपाने.

**(5)** **प्रवेश** फीच्या रुपाने .

**6) अनामत रूपाने संस्थेच्या सभासदांकडून**

**ब) ठेव स्विकारुन व रकमा कर्जाऊ घेवुन** बाहेरील कर्ज उभारणीची मर्यादा अधिनियम व त्याखालील नियमानुसार राहील.संस्थेच्या भांडवलाचा उपयोग मुख्यत: तिच्या सदस्यांच्या आथिर्क गरजा भागविण्याकरिता त्यांना कर्जे देण्याकडे व संस्थेच्या उद्देश पूर्तीसाठी केला जाईल.

**क)- निधीची गुंतवणुक -** संस्था तिच्या निधीची गुंतवणुक कलम 70 नुसार करेल.

## 6. सदस्यत्व

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व त्याखालील नियम व संस्थेचे उपविधी अन्वये नमुद केलेल्या आणि खालील अटंीची पुर्तता करणाऱ्या इसमास संस्थेचे सदस्य होता येईल -

**(1)** तो पूर्ण 18 वर्षे वयाचा व भारतीय करार कायदयान्वये करार करण्यास सक्षम असला पाहिजे.

**(2)** त्याची पत चांगली असली पाहिजे.

**(3)** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व त्याखालील नियमानुसार विहित करण्यात आलेल्या नमुन्यात त्याने सदस्यत्वाकरता अर्ज दिला पाहिजे.तो स्वत: उपविधी क्र. 1(3) मध्ये नमुद केलेल्या कार्यक्षेत्रातील खातेदार अथवा कायम रहिवासी असला पाहिजे व त्याने किमान 10 आर क्षेत्र धारण केले असल्याबाबतचा सातबाराचा उतारा अर्जासोबत जोडला असला पाहिजे.परंतु **उपविधी क्र.4(14) मध्ये नमुद केलेल्या उद्देशासाठी सदस्यत्वाचा अर्ज असेल तर क्षेत्राची अट असणार नाही.**

**(4)** **त्याने** आपल्या जिंदगी व कर्जाचे वास्तव आर्थिक पत्रक दिले असले पाहिजे.

(5) **संस्थेचे** उद्देश त्यास समजले असलेबाबत त्याने हमी दिली पाहिजे

(6) **त्याने** रु.100/- प्रवेश फी दिली असली पाहिजे.

(7) **त्याने** किमान एक तरी भाग घेऊन त्याची पूर्ण रक्कम भरली असली पाहिजे.

(8) **अशी** व्यक्ती किंवा त्यांचे जवळचे नातेवाईक सावकारीचा व्यवसाय करीत नसले पाहिजे अथवा तो किंवा त्यांचे जवळचे नातेवाईक असा व्यवसाय करित असलेल्या भागीदारी पेढया व कंपनी यांचा संचालक अथवा भागीदार नसला पाहीजे.जवळचे नातेवाईक याचा अर्थ पती, पत्नी,वडील,आई, मुलगा,मुलगी,जावई व सून.

(9) **संस्थेच्या** कार्यक्षेत्रात अशाच प्रकारची संस्था नव्याने स्थापन होत असल्यास अशा प्रस्तावित संस्थेचासभासद होण्यासाठी मुळ संस्थेच्या सभासदत्वाचा राजीनामा दिल्याशिवाय व मुळ संस्थेस सभासदांकडून येणे असलेली सर्व बाकी परतफेड केल्याशिवाय त्यास नव्याने स्थापन होणाऱ्या संस्थेचे सभासदत्व धारण करता येणार नाही.

**10) सभासद - संस्थेचे खालीलप्रमाणे सभासद असतील-**

**अ) क्रियाशील सभासद- क्रियाशील सभासद म्हणजे संस्थेचा असा सभासद जो संस्थेच्या सलग पाच वर्षाच्या कालावधीमध्ये सर्व सभासदांच्या अधिमंडळाच्या किमान एका सभेला उपस्थित आहे आणि खालील बाबीची पूर्तता केली आहे असा भागधारक सभासद -**

**सलग पाच वर्षाच्या कालावधीमध्ये किमान एक वेळा अल्प मुदत कर्ज (रोख रकमेच्या स्वरुपात अथवा अन्य प्रकारे) अथवा मध्यम मुदत कर्ज घेतले अथवा दिर्घ मुदत कर्ज घेतले असले पाहिजे.**

ब) अक्रियाशिल सभासद - जो सभासद वरील (अ) मधील तरतुदीची पुर्तता करित नसेल अशा सभासदंाचे वर्गीकरण अक्रियाशिल सभासद म्हणून करण्यात येईल. परंतु असे वर्गीकरण केलेल्या सभासदाने वरील (अ) मधील तरतुदीची पुर्तता केल्यावर,तो क्रियाशिल सभासद म्हणुन त्याचे पुन:वर्गीकरण केले जाण्यास पात्र होईल.

दर आर्थिक वर्षाच्या अखेरीस समिती , क्रियाशिल सभासद म्हणुन पुन:वर्गीकरण केले जाण्यास पात्र ठरलेले अक्रियाशिल सभासद व क्रियाशिल सभासद म्हणुन पुन:वर्गीकरण केले जाण्यास अपात्र ठरलेले अक्रियाशिल सभासद यांचा आढावा घेवुन त्याची नोंद संबंधीत नोंदवहीमध्ये करेल.

ब-1) समिती दर आर्थिक वर्षाच्या अखेरीस असे वर्गीकरण करील व त्याची अक्रियाशिल सभासद झाल्याच्या दिनांकाची या करीता ठेवलेल्या नोंदवहीमध्ये नोंद करेल आणि समिती आर्थिक वर्षाच्या समाप्त होण्याच्या दिनांकापासुन तीस दिवसांच्या आत,संबंधीत सदस्याला,अशा वर्गीकरणाबाबत हस्ते वटवड्याने अगर नोंदणीकृत पोच देय डाकेने कळविल.

ब-2) अक्रियाशिल सभासद म्हणुन वर्गीकरण केल्याच्या दिनांकापासुन पुढिल पाच वर्षामध्ये वरील अ मधील तरतुदींची पुर्तता केली नाही तर ,असा कोणताही अक्रियाशिल सभासद अधिनियमाचे कलम 35 अन्वये त्याला काढुन टाकले जाण्यास पात्र ठरेल.

ब-3) क्रियाशिल सभासद किंवा अक्रियाशिल सभासद असण्याबाबत वाद उद्भवल्यास,अशा सभासदास, अधिनियमाचे कलम 26 मधील तरतुदीनुसार संस्थेच्या निबंधकाकडे विहीत मुदतीत अपील करता येईल.

क ) सहयोगी, नाममात्र सदस्य :-

“**सहयोगी**” “**नाममात्र सदस्य**” म्हणून एखाद्या इसमास त्याच्या अर्जावरुन अधिनियम कलम 24 मधील तरतूदींनुसार सदस्य करुन घेता येईल.

**(11)** मयत सदस्याचे भाग अगर हितसंबंध वारसाहक्काने मिळविणारे अज्ञान अगर वेडसर इसम यांना अनुक्रमे त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी अगर पालक यांच्या मार्फत अधिनियम, नियम व उपविधी यात सदस्य करुन घेण्यासंबंधी ठरविलेल्या कार्य पध्दतीनुसार नियम 1961 चे नियम 20 प्रमाणे सदस्य करुन घेता येईल आणि अधिनियम व नियमानुसार उपविधीत नमूद केलेल्या हक्कांचा उपभोग व जबाबदाऱ्या यांच्या मार्फत घेता येतील .

**(12)** या उपविधी <u>क्रमांक 6</u> मध्ये काहीही नमूद केले असले तरी राज्य व केंद्र शासन व पैसा पुरविणारी वित्तीय संस्था यांना संस्थेचे सदस्य होता येईल.

**(13)** संस्थेत एखादी सभासद झालेली व्यक्ती कोणताही पेशा, धंदा , कामधंदा करित आहे किंवा चालवत आहे किंवा काय, किंवा ती त्या वर्गाची आहे किंवा नाही अगर सभासद होण्याच्या इतर अटी तीने पाळल्या किंवा काय, असा कोणताही प्रश्न निर्माण झाल्यास त्याचा निर्णय अधिनियम कलम 11 अन्वये नोंदणी अधिकारी देतील.

**(14)** महाराष्ट्र राज्य कृषी व ग्रामीण बहुउद्देशीय विकास सहकारी बँक (भूविकास बँक), जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अगर बाजार (खरेदी-विक्री) संस्था सोडून इतर कोणत्याही कर्जपुरवठा करणा-या एकापेक्षा जास्त संस्थाचा सदस्य असणा-या प्रत्येक इसमाने जर यापूर्वीच प्रतिज्ञापत्र केले नसेल तर नियमातील के नमुन्यात "मी फक्त एकाच संस्थेकडून कर्ज घेईन ” असे प्रतिज्ञापत्र संस्थेकडे नियम 45 मधील

तरतूदींनुसार सादर केले पाहिजे. तसे न केल्यास त्या नियमानुसार त्यांच्याविरुध्द कायदेशीर कार्यवाही केली जाण्यास तो पात्र ठरेल.

**15)** अधिनियम कलम 33 व कलम 105 मधील तरतूदींना अधिन राहून सदस्यांची जबाबदारी त्याने घेतलेल्या भागांच्या रकमांपैकी व भरलेल्या रकमेइतकी राहील व सदर रकमेस तो व त्याची जिंदगी जबाबदार राहील.

16) साधारण सभेस हजर असणा-या व मताचा अधिकार असणा-या सदस्यांच्या संख्येत तीन चतुर्थांश सदस्यांच्या मताने कोणाही सदस्यास खालील पैकी कोणत्याही कारणाकरता संस्थेतून काढून टाकता येईल मात्र त्यासाठी नोंदणी अधिका-यांची मान्यता घेणे आवश्यक आहे -

अ ) तो आपली बाकी सतत थकविणारा असेल तर

ब) समितीच्या मते तो संस्थेच्या हितसंबंधाविरुध्द काही कृत्य करीत असेल अगर संस्था व्यवस्थित चालविण्यात अडथळे आणीत असेल तर

क) समितीच्या मते त्याने संस्थेला बदनाम केले असेल तर

ड) संस्थेमार्फत आपल्या मालाची विक्री करण्यासंबंधीच्या अगर संस्थेशी होणा-या त्याच्या व्यवहाराच्या इतर बाबीसंबंधी उपविधीचे सतत उल्लंघन करीत असेल तर

इ ) भागाचा हप्ता थकविला असेल तर

ई) त्याचे दिवाळे निघाले असेल तर अगर तो कायद्याने नादार ठरला असेल तर

उ) समितीवर सदस्य असताना त्याला फौजदारी गुन्हयाबद्दल शिक्षा झाली असेल तर

कोणत्याही सदस्यास संस्थेतून काढून टाकताना अधिनियमाचे कलम 35, नियम 28 व 29 मधील तरतूदी ध्यानी घेतल्या जातील व त्यात नमूद केलेल्या रितीचा

अवलंब केला जाईल. काढून टाकलेल्या सदस्यास त्यातील तरतूदींनुसार पुन्हा सदस्य करता येईल.

ऊ) कलम 26 चे परंतुकानुसार व वरील ब-2 मधील तरतुदीनुसार पुन:वर्गीकरणास अपात्र ठरलेस

**(17) खालीलपैकी** कोणत्याही कारणामुळे एखाद्याचे सदस्यत्व बंद होईल -

अ) त्याने सदस्यत्वाचा दिलेला राजिनामा मंजूर झाल्यास

ब) त्याच्या नावावरील सर्व भाग अगर हितसंबंध दुस-याच्या नावावर वर्ग झाल्यास

क) तो मयत झाल्यास

ड) त्याला संस्थेतून काढून टाकले असल्यास

इ) तो कायमचा वेडा झाल्यास

ई) एखादा सदस्य स्वत: अगर त्याचा निकटचा नातेवाईक सावकारी धंदा करीत असल्यास

उ) संस्थेच्या कार्यक्षेत्रातील सर्व शेत जमीन विक्री किंवा हस्तांतरीत केली असेल तर

18) संस्था खालील संस्थाना नाममात्र सभासद करुन घेईल -

1. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक
2. सहकारी देखरेख संस्था
3. तालुका सहकारी खरेदी विक्री संघ
4. जिल्हा सहकारी मंडळ (डिस्ट्रिक्ट को-ऑप बोर्ड)
5. संस्थेच्या कार्यक्षेत्रातील सहकारी साखर कारखाना

6. नागरी सहकारी बँका/नागरी सहकारी पत संस्था
7. इफको/कृपको
8. पणनन मंडळ
9. एम.सी.डी.सी
10. एन.सी.डी.सी
11. संस्थेच्या सर्वसाधारण सभेच्या परवानगीने इतर संस्था

## 7. भाग

(1) प्रत्येक भागाची दर्शनी किंमत रु.100/- राहील.एकूण भागभांडवलाची कमाल मर्यादा रु_____________राहील. तसेच एकूण भागांची संख्या_______________राहील. भाग मंजूर होताच प्रत्येक भागाची रक्कम सदस्याने एकदम भरली पाहिजे. भागांची पूर्ण रक्कम जमा झाल्यावरच भागाचा दाखला दिला जाईल. ठरल्याप्रमाणे भागाची रक्कम भरली न गेल्यास भागाकरिता भरलेली रक्कम जप्त होण्यास पात्र होईल परंतु तो जप्त करण्यापूर्वी भागाची रक्कम भरण्याबद्दल 14 दिवसांची लेखी मागणी नोटीस देवुन अनुपालन करण्यासाठी नोटिस मिळाल्याच्या दिनांकापासुन तीन महिने मुदतीचा कालावधी त्या सदस्यास दिला जाईल.

(2) **संस्थेच्या** एकूण भागांच्या एकपंचमांश भाग अगर रुपये वीस हजार किंमतीचे भाग यापैकी जे कमी असेल तितके भाग कोणत्याही सभासदास धारण करता येतील. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अशा ठेवीवर ज्या दराने व्याज देत असेल त्या दराने अशा ठेवीवर व्याज दिले जाईल.

अ) वरील उपविधीत काहीही असले तरी, राज्य शासनास अग्रहक्काने परतफेडीचे भाग घेता येतील.राज्य शासनाकडून मिळालेले भागभांडवल शासन ठरविल त्या अटींवर

परतफेडीच्या अग्रहक्काने असेल व त्या संबंधीचे भाग दाखले मा.ना.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या नावे देण्यात येतील.

ब) राज्य सरकारचे भागभांडवल परत करण्यासाठी दरवर्षी निव्वळ नफा काढण्यापूर्वी अधिनियमाचे कलम 65 अन्वये भागभांडवल परतफेड निधीची तरतूद केली जाईल व त्या निधीची गंुतवणूक स्वतंत्रपणे करण्यात येईल.

क) शासनाचे भागभांडवल संपूर्ण फेड होईपर्यंत कोणाही सभासदांची भागाची रक्कम परत केली जाणार नाही.

**(3)** **सभासदाने** जादा भागा करिता लेखी अर्ज केला पाहिजे. समितीकडून अशा अर्जांवर निर्णय केला जाईल मात्र ही तरतुद कर्ज देते वेळी कापून घेतलेल्या भागाकरीता लागू असणार नाही.

**(4)** **सभासद** जर प्रथमत: संस्थेकडून कर्ज घेत असल्यास दहा टक्के व त्यानंतरच्या कर्जास जास्तीत जास्त पाच टक्के भाग रक्कम कपात करण्यात येईल

**(5)** **एकाच** तारखेस विकत घेतलेल्या प्रत्येक भागाबद्दल निराळा क्रमांक असलेला भागाचा दाखला दिला जाईल अथवा एकापेक्षा जास्त भाग घेतले असल्यास त्या सर्व भागांबद्दल निरनिराळे क्रमांक देउुन भागांचा एकत्रित एकच दाखला दिला जाईल.

**(6)** **भागांचे** हस्तांतरण अधिनियम कलम 30 व नियम 24 ते 26 यामधील तरतूदींनुसार केले जाईल.

**(7)** **सदस्याने** संस्थेमध्ये कमीत कमी एक वर्षभर धारण केल्याशिवाय तो भाग हस्तांतरित करता येणार नाही. या कालावधीनंतर समितीच्या मंजूरीने दुस-या सदस्यास अगर ज्याच्या सदस्यत्वाचा अर्ज समितीने मंजूर केला असेल अशा

इसमाच्या नावे तो भाग हस्तांतरित करता येईल. प्रत्येक भाग हस्तांतरित करण्याकरिता रु.10/- फी आकारली जाईल. ज्यांच्या नावे भाग हस्तांतरित केला त्याचे नाव भागाच्या हस्तांतरण नोदणी पुस्तकात दाखल केल्याखेरीज व हस्तांतरित करणा-याने आपली संस्थेची देणी संपुर्णपणे भागविल्याखेरीज भागांचे हस्तांतरण पूर्ण होणार नाही.

(7 अ) अधिनियम कलम 23 (2) अन्वये नोंदणी अधिकारी यांनी सभासद करुन घेणेचे अपील मंजूर केलेली व्यक्ती, अगर कलम 23 (1-अ) प्रमाणे मानीव सभासद झालेली व्यक्ती सभासद आहेत असे समजण्यात आलेली व्यक्ती यांच्या नावे भाग हस्तांतरित करता येतील.

**(8)** **कोणाही** सदस्यास लेखी संमतीपत्र देऊन अगर त्या कामासाठी ठेवलेल्या कोणत्याही पुस्तकात निवेदन नमूद करुन संस्थेच्या पगारी अधिकारी इसमाखेरीज इतर कोणाही इसमाची नियम 25 मधील तरतूदीनुसार, मरणानंतर संस्थेत असणा-या आपल्या भागाचे हितसंबंधाचे वारसदार म्हणून नेमणूक करता येईल अगर अशा व्यक्तीची केलेली नेमणूक रद्द करता येईल अगर तीच्यात बदल करता येईल. अशा पहिल्या नेमणूकीकरिता फी आकारली जाणार नाही पण त्या नेमणूकीने कोणताही फेरफार करण्याबद्दल अगर अशी नेमणूक रद्द करण्याबद्दल प्रत्येक वेळी दहा रुपये फी द्यावी लागेल.

**(9)** **एखादा** सदस्य मयत झाल्यास, त्याचे भाग अगर हितसंबंध त्याने नेमलेल्या वारसाच्या नावे वर्ग केले जातील. असा वारसदार नेमला नसेल तर, त्याचे भाग अगर हितसंबंध अधिनियम कलम 30 व नियम 35 मधील तरतूदीनुसार त्याचे वारसाच्या अगर कायदेशीर प्रतिनिधीच्या नावे हस्तांतरित केले जातील मात्र हस्तांतरण करण्यापूर्वी त्या नेमलेल्या वारसास अगर कायदेशीर प्रतिनिधीस संस्थेचा सदस्य

करुन घेतले जाईल. त्याकरिता संस्थेने ठरविलेल्या नमुन्यात त्याने अर्ज केला पाहिजे. सदस्यात्वाकरिता त्याला पुन्हा भाग विकत घेण्याची जरुरी नाही. मयताच्या वारसास सदस्य करुन घेणे व त्याच्या नावावर भाग हस्तांतरित करणे या दोन्ही बाबी एका मागून एक लगेच केल्या जातील.

**(10)** **एखादा** सदस्य मयत झाल्यावर त्याच्या खात्यात असलेल्या भागांच्या किंवा हितसंबंधाच्या रकमेतून संस्थेस त्यांचेकडून येणे असेल तर ते वजा करुन राहिलेली बाकी त्याने नेमून दिलेल्या वारसदारांना अथवा वारसदार नेमला नसेल तर समितीच्या मते मयताचा जो कोणी योग्य वारस अगर कायदेशीर प्रतिनिधी असेल त्याच्याकडून योग्य त्या प्रमाणात भरपाईचा रोखा (Bond Of Indemnity) लिहून घेऊन, मागणी केल्यापासून सहा महिन्यांच्या आत अधिनियम व नियम मधील तरतूदीनुसार दिली जाईल.

**(11)** अ ) सदस्य म्हणून कमी झालेल्या इसमास तो कमी झाल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत त्याच्या भागाची रक्कम  परत दिली जाईल मात्र त्याच्याकडे येणे असलेल्या रकमा त्या भागाच्या रकमेतून कापून घेतल्या जातील.तसेच कोणत्याही सालात परत करावयाचे भागभांडवल हे त्यापूर्वीच्या 31 मार्चपूर्वी असलेल्या संस्थेच्या एकूण भागभांडवलाच्या दहा टक्केपेक्षा जादा असता कामा नये.

ब) संस्थेने सरकारकडून अगर वित्तीय संस्थेकडून कर्ज घेतले असेल तर, अनुक्रमे **नोंदणी अधिकारी अगर वित्तीय संस्था यांच्या  संमतीशिवाय** संस्थेस कोणत्याही भागाची रक्कम परत करता येणार नाही  अगर इतरांकडून बाहेरील कर्जे अगर ठेवी घेता येणार नाहीत.

(शासन अथवा वित्तीय संस्थेचे अर्थसहाय्य असल्यास अनुक्रमे नोंदणी अधिकारी अथवा वित्तीय संस्थेची पुर्वसंमती घेणे बंधनकारक असावे)

क) ज्या व्यक्तीचे सदस्यत्व बंद झाले असेल अथवा अधिनियम,नियम व उपविधीप्रमाणे जी व्यक्ती सदस्य म्हणून चालू रहाण्यास अपात्र ठरली असेल त्या व्यक्तीचे नांव समीती आपल्या सदस्य नोंदवहीतून काढून टाकेल समीतीने या तरतुदीचे पालन केले नाही तर,नोंदणी अधिकारी अशा व्यक्तीचे नाव काढून टाकण्याचा हुकूम देतील आणि अशा हुकूमाचे पालन करणे समीतीवर बंधनकारक राहील.

12) **एखाद्या** सभासदाचे भाग अल्पाशांने परत केले जाऊ शकतील परंतु प्रत्येक भागाची त्या आर्थिक वर्षाची किंमत (नक्त मुल्य) लेखापरिक्षक आपल्या अहवालात नमुद करतील. भागाचे देय मुल्य कलम 29 व नियम 23 नुसार निश्चित केले जाईल.देय मुल्य काढताना वसुल भागभांडवल व संचित तोटे वजा जाता राहणा-या रक्कमेतुन काढले जाईल.एखाद्या सभासदाचे सभासदत्व संपुष्टात आले असेल तर मात्र भागाची रक्कम पुर्णपणे दिली पाहिजे तथापी ती त्या भागाच्या त्या वर्षीच्या देय मुल्यापेक्षा जास्त नसावी.

भागाची किंमत खालील प्रमाणे काढली जाईल-

$$\text{भागाची निव्वळ किंमत} = \frac{\text{वसुल भाग भांडवल - संचित तोटे}}{\text{एकूण भाग}}$$

भाग धारकाला त्याच्या येणे कर्जाच्या कमीत कमी 2 टक्के भाग संस्थेकडे ठेवणे बंधनकारक राहील.

**13)** संस्थेचे भाग हस्तांतरण करताना अधिनियम व नियम यातील तरतुदींच्या अधिनतेने पुढील प्रमाणे हस्तांतरीत केले जातील-

1) प्रत्येक सभासदांची येणे बाकीच्या 2 टक्के भाग धारण असल्यास पुन्हा शेअर्स कपात केली जाणार नाही.
2) सभासदांचे भाग वारसा हक्काने हस्तातंरीत करताना दर्शनी मुल्यांनी हस्तातंरीत केले जातील.
3) सभासदाचे भाग संस्थेच्या इतर सभासदांना हस्तांतरीत करताना दर्शनी मुल्यांनी हस्तांतरीत केले जातील.
4) सभासदांचे भाग संस्थेच्या नवीन सभासदांना हस्तांतरीत करताना त्या वर्षाच्या ताळेबंदाप्रमाणे नक्त मुल्य काढुन हस्तांतरीत केले जातील.
5) सभासदांचे भाग त्यांच्या कर्जामध्ये हस्तांतरीत करताना त्या वर्षाच्या ताळेबंदाप्रमाणे नक्त मुल्य काढुन हस्तांतरीत केले जातील.
6) सभासदांचे भाग अल्पांशाने संस्थेस परत करताना त्या वर्षाच्या ताळेबंदाप्रमाणे नक्त मुल्य काढुन हस्तांतरीत केले जातील.

सभासदांचे भाग राजीनामा दिल्यानंतर पुर्णपणे संस्थेस परत करताना त्या वर्षाच्या ताळेबंदाप्रमाणे नक्त मुल्य काढुन हस्तांतरीत केले जातील.संस्थेचे भाग सभासदास पुर्णपणे परत दिल्यानंतर अशा सभासदास कोणत्याही परिस्थितीत तीन वर्षापर्यत संस्थेचे पुन:श्च सभासद करुन घेणेत येणार नाही.परंतु राजीनामा देताना धारण केलेल्या भागांच्या किंमती एवढे भाग घेवुन त्यास कोणत्याही वेळी पुन्हा सदस्यत्व प्राप्त करता येईल.

## 8.सर्वसाधारण सभा

**(1)** **संस्थेच्या** सदस्यांच्या सर्वसाधारण सभेकडे संस्थेची अखेरची सत्ता राहील पण ती सत्ता अधिनियम, नियम व उपविधी यातील तरतूदींना अधिन राहील.

**(2)** नोंदणीनंतर संस्थेची पहिली सर्व साधारण सभा नियम 59 मधील तरतूदीनुसार भरविली जाईल व त्या सभेत त्याच तरतुदीनुसार कामे केली जातील.पहिल्या साधारण सभेव्यतिरिक्त संस्थेच्या इतर सर्वसाधारण सभा नियम 60 मधील तरतुदीनुसार नोंदणी अधिका-याला सुचना देवुन आवश्यकतेनुसार भरवील्या जातील व त्याच तरतुदीनुसार सदर सभांचे कामकाज करण्यात येईल.परंतु प्रत्येक वर्षी 31 मार्च नंतर 30 सप्टेंबरच्या आत, अधिनियम कलम 75 व नियम 60 मधील तरतूदीनुसार वाषिर्क सर्व साधारण सभा बोलाविणे बंधनकारक राहील. मुदतीत सभा घेण्याची जबाबदारी संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांची राहिल.

**(अ)** नियम 61 अन्वये विहीत नमुन्यात तयार केलेले लेख्यांचे वार्षिक विवरणपत्रांपैकी नफा तोटा पत्रक व ताळेबंद याची प्रत,समितीच्या वाषिर्क प्रतिवृत्ताची प्रत आणि मागील सहकार वर्षाच्या लेखापरिक्षण ज्ञापनाचा सारांशाची प्रत वार्षिक सर्व साधारण सभेच्या तारखे पूर्वी 14 (चौदा) दिवस संस्थेच्या नोटीस बोर्डावर लावले जातील व सभेच्या 14 दिवस अगोदर त्या वर्षाचा आर्थिक पत्रके असणारा संस्थेच्या कामकाजाचा अहवाल सभासदांना पाठवला जाईल व नंतर ते सर्व साधारण सभेपुढे मंजूरी करिता ठेवले जातील.

**( ब)** सर्वसाधारण सभेने करावयाच्या कामात पुढील कामांचा समावेश होतो

**1)** खालील कामे वार्षिक सर्वसाधारण सभेतच केली जातील-

अ) तक्रार निवारण समीतीची नियुक्ती करणे

ब) मागील आर्थिक वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल वाचन करणे

क) लेखापरीक्षण करण्यात आलेले जमा-खर्चाचे लेखे,नफा तोटा पत्रक व ताळेबंद यामध्ये आवश्यकतेनुसार सुधारणा करुन त्यांना मंजुरी देणे

ड) संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नफा वाटणीस लेखापरीक्षणातील अभिप्रायाच्या अधिनतेने मंजुरी देणे.

इ) आधीच्या लेखापरीक्षेचा दुरुस्ती अहवाल सादर करणे.

ई) संचालक मंडळाने शिफारस केलेल्या पुढील वर्षाच्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे.

उ) सदस्यांचे हकालपट्टीबाबत सभेपुढे आलेल्या विषयांचा निर्णय घेणे.

ऊ) पुढील आर्थिक वर्षासाठी शासनाने/निबंधकाने मान्य व प्रसिध्द केलेल्या लेखापरीक्षकांच्या नामतालिकेमधील लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे, दरवर्षी आर्थिक वर्ष संपल्यानंतर सहा महिन्यांच्या आत लेखापरीक्षण करुन घेणे

2) मागिल सभेत झालेल्या कार्यवृत्तांताचा, कार्यवाहीचा आढावा.

3) लेखापरीक्षण अहवालाचा दोषदुरुस्ती अहवाल सादर करणे. विहित मुदतीत दोषदुरुस्ती अहवाल सादर न केल्यास कलम 82 नुसार शास्ती लागू होतील.

4) कलम 75 मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी जर संस्थेच्या सर्वसाधारण सभेने एखादया बाबीवरील खर्च नामंजुर केल्यास सदर मुद्यांसंबधी चौकशी करण्यासाठी निबंधकास कळविणे

5) उपविधी क्रमांक 5 मधील मर्यांदेस अधीन राहून पुढील वर्षाकरिता उभारावयाच्या बाहेरील कर्जाची मर्यादा ठरविणे.

**6)** अधिनियम कलम 44 व नियम क्रमांक 42 व 43 मधील तरतूदींनुसार प्रत्येक सदस्याची कर्जाची पत ठरविणे व मालाच्या तारणावर द्यावयाच्या कर्जाच्या मर्यादा ठरविणे.

**7)** संस्थेमार्फत घरगुती अगर शेतीउपयोगाकरिता कोणत्या प्रकारच्या वस्तू पुरवावयाच्या ते ठरविणे व अशा पुरवठयाबद्दल किती कमिशन व इतर खर्च घ्यावयाचा ते ठरविणे.

8) सदस्यांना भाडयाने देण्याकरिता शेती अवजारे, यंत्रे इत्यादी साधने खरेदी करण्यास मंजूरी देणे व त्यांच्या भाडयाचा दर ठरविणे.

**(9)** शेती व ग्रामीण धंदयासाठी केलेल्या निरनिराळया प्रकारच्या मालाच्या विक्रीवर किती, कमीशन व इतर खर्च घ्यावयाचा ते ठरविणे.

**(10)** सहकार खात्याकडून व केंद्रीय सहकारी बँकेकडून आलेला पत्रव्यवहार यांचा विचार करणे.

**(11)** उपविधी क्रमांक 6 (23) प्रमाणे सदस्यांना संस्थेकडून काढून टाकण्याच्या कामी करावयाच्या उपाययोजनेचा विचार करणे.

**(12)** **नवीन** उपविधी स्वीकारणे, अंमलात असलेल्या उपविधीत बदल करणे किंवा काही उपविधी वगळणे

**(13)** **उपविधी** क्रमांक 12 (21) प्रमाणे, कर्जाच्या एक वर्षापेक्षा अधिक मुदतीला वित्तीय पतपुरवठा करणाऱ्या संस्थेच्या संमतीने तहकुबी देणे.

**(14)** **लगतपूर्व** वर्षात कोणत्याही समिती सभासदास व त्याच्या कुटूंबास ("कुटुंब" म्हणजे पती, पत्नी, आई, वडील, भाऊ, बहीण, मुलगा, मुलगी, जावई किंवा सून यांना) संचालक, सभासद अगर भागीदार असलेल्या संस्था, भागीदार असलेल्या संस्था, भागीदार पेढया किंवा कंपन्या यांना दिलेल्या कर्जाचा, त्याच्या परतफेडीचा व चालू

वर्षअखेर येणे राहिलेल्या कर्जाचा तपशील देणारी माहितीपत्रके संस्थेच्या वार्षिक सभेपुढे ठेवली पाहिजेत.

(15) शासनाने तयार केलेल्या लेखापरिक्षकाच्या नामतालिकेवरील लेखापरिक्षकाची नियुक्ती करणे, पुर्वी केलेली नियुक्ती रद्द करणे व त्यानुषंगाने पुननिर्युक्ती करणे.

(16) इतर कोणत्याही संस्थेशी भागीदारी करार करणेबाबत निर्णय घेणे.

(17) मत्ता व दायित्वे हस्तांतरण, एकत्रिकरण, विभाजन, हस्तांतरण याबाबतचा निर्णय घेणे.

(18) निबंधकाने दाखल केलेल्या चौकशी अहवालावर कार्यवाही करणे

(19) **बुडीत** कर्जाबाबत निर्णय घेणे

(20) **संघीय** संस्थेशी संलग्न होणेबाबतचे निर्णय घेणे परंतु असा ठराव संस्थेच्या एकूण सदस्यांच्या 3/4 (तीन चतुर्थांश ) बहुमताने मंजूर होणे आवश्यक आहे.

(21) संस्थेच्या निरनिराळया व्यवहारांसाठी विभागवार उपसमित्या नेमणे.

(22) अधिनियम कलम 76 मधील तरतूदीनुसार संस्थेला विशेष साधारण सभा बोलाविता येईल व त्याच तरतूदीनुसार ती बोलाविलीच पाहिजे. खालील परिस्थितीत ती एक महिन्यात बोलाविलीच पाहिजे.

**अ) संस्थेच्या एकूण सभासद संख्येच्या एक पंचमांश (1/5)एवढया सभासदंानी लेखी मागणी केल्यास**

**ब) नोंदणी अधिकारी यांनी सूचना केल्यास**

क) एखादी संस्था संघीय संस्थेची सभासद असल्यास अशा संघीय संस्थेने मागणी केल्यास

(23) सर्वसाधारण सभांची कार्यरित नियम 60 मधील तरतूदीनुसार असेल.

(24) वार्षिक साधारण सभेची 14 दिवसांची व विशेष साधारण सभेची सात दिवसांची लेखी नोटीस व कार्यक्रम पत्रिका अशा सभेपूर्वी काढून संस्थेच्या सचिवाने ती सभा बोलाविली पाहिजे.अशा सभेची सूचना **नोंदणी अधिकारी** यांना दिली पाहिजे.सभेची नोटीस व कार्यक्रमपत्रिका संस्थेच्या कचेरीच्या नोटीस बोर्डावर व संस्थेच्या कार्यक्षेत्रात असलेल्या गावातील प्रमुख ठिकाणी डकवून **प्रसिध्द केली पाहिजे.त्याच प्रमाणे सदर नोटीस डकविल्याचा पंचनामा केला पाहिजे. पंचनामा करताना तो गावच्या पोलीस पाटील / सरपंच / तलाठी /ग्रामसेवक / स्थानिक स्वराज संस्थांचे सदस्य यापैकी किमान दोन प्रतिनिधींच्या समक्ष पंचनामा केला पाहिजे.सभेची नोटीस सभासदाला बजावल्याचा पुरावा संस्थेच्या दप्तरी ठेवला पाहिजे. सदर** नोटीशीत सभेची तारीख, नेमकी वेळ, सभेचे ठिकाण व सभेमध्ये केली जाणारी कामे नमूद केली पाहिजेत. संस्थेचा अध्यक्ष व त्याच्या गैरहजेरीत समितीचा उपाध्यक्ष यांनी सचिवासह नोटीशीवर सहया केल्या पाहीजेत.

**(1) सर्वसाधारण सभेत हजर असलेल्या सदस्यांपैकी दोन तृतीयांश सदस्यांच्या परवानगीने कार्यक्रम पत्रिकेत दाखल नसलेला विषय कोणाही सदस्यास सभेपुढे मांडता येतील.**

**(2) कोणत्याही साधारण सभेत एकूण सदस्यांच्या संख्येत दोन पंचमांश अगर पंचवीस (यापैकी कमी संख्या असतील एवढे) सदस्य गणपूर्ती (कोरम) करीता आवश्यक असतील.**

**(3) संस्थेचे अध्यक्ष हे वार्षिक सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष राहतील, अध्यक्ष गैरहजर असतील तेव्हा उपाध्यक्ष हे अध्यक्ष म्हणून काम पाहतील. ज्यावेळी अध्यक्ष व उपाध्यक्ष दोघेही गैरहजर असतील त्यावेळी हजर असणा-या सभासदांमधून त्या सभेपुरता अध्यक्ष निवडला जाईल.**

(4) अधिनियम कलम 27 व नियम 60 मधील तरतूदींनुसार साधारण सभेत मतदान केले जाईल. सभेस हजर असणा-या प्रत्येक सदस्यास एकापेक्षा जास्त मत देण्याचा अधिकार असणार नाही.ज्या कर्जदार सभासदाने आपल्या कर्जफेडीचे लागोपाठ दोन अगर जादा हप्ते थकविले असतील तो मतदार कलम 27 (10) प्रमाणे मत देण्यास अपात्र राहील मात्र त्याने आपल्या कर्जाच्या परतफेडीसाठी आपला पुरेसा शेतीमाल आपल्या भागाच्या खरेदी -विक्री संस्थेकडे अगर संस्करण संस्थेकडे विक्रीकरिता दिला असेल तर, तो मतदानास अपात्र असणार नाही. मात्र स्वत:च किती किंमतीचा माल विक्रीकरिता दिला आहे याबद्दलचे प्रमाणपत्र त्याने सदर संस्थेकडून आणून दाखल केले पाहिजे. तसेच सभासद क्रियाशील सभासद नसल्यास त्यास सर्वसाधारण सभेत मतदान करता येणार नाही. एखाद्या ठरावावर मतदान सारखेच विभागले गेल्यास अध्यक्षास एक निर्णायक मत असेल. एखाद्या ठरावावर (मतैक्य न झाल्याने ) सदस्य विभागले गेले असतील तेव्हा, मतदान करणा-या कोणाही सदस्याला मतमोजणी (पोल ) करण्याची मागणी करता येईल. त्यानंतर अध्यक्षाने ती मंजूर केली पाहिजे. समितीच्या अगर इतर निवडणूका उपविधी मध्ये निदिर्ष्ट केल्याप्रमाणे गुप्त मतदान पध्दतीने करावयाच्या असल्यास त्यांचे निकाल सोडून प्रत्येक ठरावाचा निकाल हात उभारुन केलेल्या मतदानावरुन केला जाईल. मतदान करणा-या सदस्यांच्या बहुमताने प्रत्येक ठराव मंजूर केला जाईल.

(5) साधारण सभेतील **मतदानाचा अधिकार :- भागधारक सभासदालाच साधारण सभेमध्ये हजर राहण्याचा, कामकाजात भाग घेण्याचा व मतदानाचा अधिकार राहील.**

(अ) मतदानाचा अधिकार मतदाराने स्वत: बजाविलेला पहिजे. दुस-यास अधिकार देवुन मतदान करता येणार नाही.

(ब) एकापेक्षा जास्त व्यक्तींनी भागाचा दाखला एकत्रित धारण केला असेल तर, भागाच्या दाखल्यास ज्याचे नाव पहिले असेल त्यास, तो सभेस गैरहजर असेल तर भाग दाखल्यात दुस-या क्रमांकाने नाव असणा-यास, दोघेही गैरहजर असतील तर तिस-या क्रमांकाने नाव असणा-या आणि अशाच क्रमांकाने दाखल्यास अगोदर नावअसलेला गैरहजर असेल तर त्याच्यानंतर नाव असणा-या पण सभेस हजर असणा-या अशा सज्ञान इसमालाच सभेत मतदानाचा अधिकार राहील.

(क) कोणत्याही नाममात्र सदस्याला मतदानाचा अधिकार असणार नाही,

(ड) कसुरदार सभासदास संस्थेच्या साधारण सभेच्या कामकाजात मतदान करण्याचा अधिकार असणार नाही तसेच अक्रियाशील सभासद यांना संस्थेच्या साधारण सभेच्या कामकाजात मतदान करण्याचा अधिकार असणार नाही

**(6)** सर्वसाधारण सभेत पास झालेल्या कोणत्याही ठरावात बदल करण्यासंबंधीची वाजवी कारणे नमुद करुन याबाबतचा ठराव, साधारण सभेत पास झालेल्या मूळ ठरावाच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत नोंदणी अधिकारी यांच्या परवानगीशिवाय कोणत्याही साधारण सभेत आणता येणार नाही.

**(7)** संस्था ज्या इतर संस्थांची सदस्य झाली असेल अशा संस्थांच्या साधारण सभांना संस्थेतर्फे प्रतिनिधी म्हणून हजर राहण्याबद्दल व मत देण्याबद्दल अधिनियम कलम 27 च्या तरतूदींना अधीन राहून, संस्था वेळोवेळी ठरवेल.मात्र नामधारी सदस्याला अशा रितीने प्रतिनिधी म्हणून पाठविता येणार नाही.तसेच निबंधकाने नियुक्त केलेल्या प्रशासकास मतदानाचा अथवा संस्थेचे वतीने निवडणूक प्रक्रियेत भाग घेण्याचा अधिकार असणार नाही.अशा वेळी प्रशासक विशेष सर्व साधारण सभा बोलवून सभासद प्रतिनिधीची नेमणुक करेल.

(8) वृत्तांत पुस्तकांत चिटणीसाने सर्वसाधारण सभेचा वृत्तांत अशी सभा पार पडल्यापासुन पंधरा दिवसांचे आत लिहुन लगतच्या समीती सभेत अंमलबजावणीसाठी ठेवला पाहिजे.

## 9. समिती

(1) संस्थेच्या कामकाजाची व्यवस्था तिच्या व्यवस्थापक समितीने पाहिली पाहिजे. व्यवस्थापक समिती एकुण 13 सदस्यांची राहील.सदर समीतीची रचना खालीलप्रमाणे राहील - अ) क्रियाशील भागधारक सभासदांमधुन निवडलेले खालीलप्रमाणे एकुण 13 सदस्य राहतील-

| | |
|---|---|
| 1. सर्वसाधारण खातेदार कर्जदार प्रतिनिधी | 8 |
| 2. अनुसूचित जाती / जमाती प्रतिनिधी | 1 |
| 3. महिला प्रतिनिधी | 2 |
| 4. इतर मागासवर्गीय प्रतिनिधी | 1 |
| 5. भटक्या विमुक्त जाती/जमाती / विशेष मागास प्रवर्ग | 1 |
| एकुण | 13 |

ब) उपविधी क्रमांक 3 मध्ये नमुद केलेप्रमाणे तज्ञ संचालक 2 (दोन) व कार्यलक्ष्यी संचालक 1 (एक) असे 3 (तीन) सदस्य, संचालक मंडळास स्वीकृत करता येतील.

(2) समितीची निवडणुक अधिनियमातील तरतुदीनुसार राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणामार्फत केली जाईल.समितीच्या निवडणुकीसाठी मतदार संघ,मतदानाचा अधिकार व मतदार याद्या खालीलप्रमाणे असतील -

अ) सर्वसाधारण खातेदार कर्जदार प्रतिनिधी 8 व राखीव जागांवरील प्रतिनिधी 5 असे एकुण 13 समिती सदस्य निवडुन देण्यासाठी पात्र सभासदांचा समावेश असलेली स्वतंत्र मतदार यादी असेल.सदर मतदार यादीमध्ये शेती व शेतीपुरक कर्ज घेणाऱ्या व अधिनियम, नियम व उपविधी यातील तरतुदीनुसार पात्र मतदार सभासदांचा समावेश होईल. सदर मतदार यादीतील मतदारांमधुन सर्वसाधारण खातेदार कर्जदार प्रतिनिधी व राखीव जागा करीता नामनिर्देशनपत्र भरता येईल अथवा स्विकृती करता येईल. सदर मतदार यादीतील मतदारांनाच सर्वसाधारण खातेदार कर्जदार प्रतिनिधी व राखीव जागा करीता मतदान करण्याचा अधिकार राहील.

3) व्यवस्थापक समीती सदस्यांचा कार्यकाल पाच (5) वर्षांचा असेल. तो कालावधी निवडणूकीच्या तारखेपासुन मोजण्यात येईल. समितीच्या मुदतीत कोणत्याही कारणाने समिती सदस्याच्या रिकाम्या होणा-या जागा अधिनियमातील तरतुदीनुसार भरल्या जातील व अशा रितीने भरलेल्या समिती सदस्यांचा कालावधी समितीच्या उर्वरीत कालावधीइतका असेल. समिती सदस्य पदाचा राजीनामा द्यावयाचा असेल तर असा राजीनामा हस्तलिखीत व स्वाक्षरीत करुन ,निरक्षर सदस्यांच्याबाबतीत दस्तुर निशाणी डावा अंगठा ठसवुन समक्ष सचिव यांचेकडे सोपविण्यात येईल. सचिव सदर राजीनामा निर्णयासाठी लगतच्या समिती सभेस सादर करील. समिती सभेच्या बहुमताने सदर राजीनामा मंजुर वा नामंजुर करेल व अशा सभेतील निर्णय सचिव संबंधीत सदस्य यांना लेखी कळविल.सदस्य यांना असा निर्णय प्राप्त झालेपासुन तो अंमलात येईल.संस्थेच्या सचिवास असा राजीनामा प्राप्त झाल्यापासुन एक महिन्याच्या आत सदरची कार्यवाही करणे समीतीवर बंधनकारक राहील.सदर मुदतीतमध्ये अशी कार्यवाही करण्यात कसुर

झाल्यास सचिवास राजीनामा प्राप्त झाल्याच्या दिनांकास सदर राजीनामा मंजुर झाला आहे असे समजण्यात येईल.

**(4) अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी पात्रता,निवड व कार्यकाल :-**

अ) समीती गठीत झाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत , नवनिर्वाचित सर्वसाधारण खातेदार कर्जदार प्रतिनिधी व राखीव सदस्यांमधुन संस्थेच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड निवडणूक निर्णय अधिकारी करेल. अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा कालावधी संचालक मंडळाच्या कालावधीइतका असेल.

ब) तज्ज्ञ संचालक व कार्यलक्ष्यी संचालक यांना अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष होता येणार नाही.

क) तज्ज्ञ संचालक व कार्यलक्ष्यी संचालक यांना अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीसाठी मतदान करता येणार नाही.

ड) अध्यक्ष पदाचा राजीनामा द्यावयाचा असेल तर असा राजीनामा हस्तलिखीत व स्वाक्षरीत करुन ,निरक्षर सदस्यांच्याबाबतीत दस्तुर निशाणी डावा अंगठा ठसवुन समक्ष सचिव यांचेकडे सोपविण्यात येईल.सचिव सदर राजीनामा निर्णयासाठी लगतच्या समिती सभेस सादर करील.समिती सभेच्या बहुमताने सदर राजीनामा मंजुर वा नामंजुर करेल व अशा सभेतील निर्णय सचिव अध्यक्ष यांना लेखी कळविल.अध्यक्ष यांना असा निर्णय प्राप्त झालेपासुन तो अंमलात येईल.संस्थेच्या सचिवास असा राजीनामा प्राप्त झाल्यापासुन एक महिन्याच्या आत सदरची कार्यवाही करणे समीतीवर बंधनकारक राहील.सदर मुदतीतमध्ये अशी कार्यवाही करण्यात कसुर झाल्यास सचिवास राजीनामा प्राप्त झाल्याच्या दिनांकास सदर राजीनामा मंजुर झाला आहे असे समजण्यात येईल.

उपाध्यक्ष पदाचा राजीनामा द्यावयाचा असेल तर असा राजीनामा हस्तलिखीत व स्वाक्षरीत करुन ,निरक्षर सदस्यांच्याबाबतीत दस्तुर निशाणी डावा अंगठा ठसवुन समक्ष अध्यक्ष यांचेकडे सोपविण्यात येईल व अध्यक्ष सदर राजीनामा मंजुर वा नामंजुर करु शकतील व असा निर्णय उपअध्यक्ष यांना लेखी कळवतील.उपअध्यक्ष यांना असा निर्णय प्राप्त झालेपासुन तो अंमलात येईल.

संस्थेच्या अध्यक्षास असा राजीनामा प्राप्त झाल्यापासुन एक महिन्याच्या आत सदरची कार्यवाही करणे अध्यक्षावर बंधनकारक राहील.सदर मुदतीतमध्ये अशी कार्यवाही करण्यात कसुर झाल्यास अध्यक्षास राजीनामा प्राप्त झाल्याच्या दिनांकास सदर राजीनामा मंजुर झाला आहे असे समजण्यात येईल.

ई ) कोणत्याही कारणामुळे अध्यक्ष आणि किंवा उपाध्यक्ष यांची जागा रिक्त झाल्यास, सर्वसाधारण खातेदार कर्जदार प्रतिनिधी व राखीव सदस्यांमधुन अध्यक्ष आणि किंवा उपाध्यक्ष यांची निवड निवडणूक निर्णय अधिकारी करेल.तसेच कोणत्याही कारणामुळे समीिती सदस्याची जागा रिक्त झाल्यास,अशी रिक्त जागा अधिनियमातील तरतुदीनुसार भरण्यात येईल व अशा सदस्याचा कालावधी समितीच्या उर्वरीत कालावधी इतका असेल.

(5) गणपुर्ती :- समिती सभेसाठी समीतीच्या सभेत मतदान करण्याचा अधिकार आहे अशा एकूण सदस्यांच्या कमीत कमी निम्म्यापेक्षा एकने अधिक उपस्थिती असल्यास गणपूर्ती होईल म्हणजेच गणपूर्तीसाठी कमीत कमी सात सदस्यांची उपस्थिती आवश्यक राहील.

अ) गणपुर्तीअभावी सभा सुरु करणे शक्य नसेल तर अशी सभा तहकुब करण्यात येईल व अशी तहकुब सभा पंधरा दिवसांचे आत घेण्यात येईल.अशा तहकुब सभेची नोटिस सचिव

**संस्था, ग्रामपंचायत व तलाठी यांचे कार्यालयाचे सुचना फलकावर सभेच्या पाच दिवस आधी प्रसिध्द करील.अशा तहकुब सभेस गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही व अशा सभेत मुळ सभेच्या विषयपत्रिकेतील विषयाखेरीज इतर कोणतेही विषयाचे कामकाज करण्यात येणार नाही मात्र अशा सभेने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी  सदर सभेचे इतिवृत्त, लगतच्या सभेने मंजुर केल्याखेरीज करण्यात येणार नाही.**

**ब) सभेस गणपुर्ती होवुन सभा कामकाज सुरु झाल्यानंतर  कोणत्याही वेळी कोणत्याही कारणामुळे सभेस गणपुर्ती होत नसल्याचे सभाअध्यक्ष अथवा सचिव यांचे निदर्शनास आल्यास अशा सभेस उपरोक्त 'अ' मधील तरतुद जशीच्या तशी लागु होईल.**

**(6) तज्ज्ञ संचालक  यांना समीतीच्या सभेच्या कामकाजात पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकी व्यतिरिक्त इतर ठरावांच्या बाबतीत आपले मत नोंदविता येईल.  कार्यलक्ष्यी संचालक यांना समीतीच्या सभेच्या कामकाजात भाग घेता येईल व त्यांना सदर सभेत आपले विचार नोंदविता येईल परंतू त्यांना मतदानामध्ये भाग घेता येणार नाही अगर त्यांना मतदानाचा अधिकार असणार नाही. तसेच तज्ज्ञ संचालक  व कार्यलक्ष्यी संचालक यांची गणना समिती सभेच्या गणपूर्तीसाठी करता येणार नाही.**

**(7)** समितीच्या सभेची लेखी सूचना,सभेपुढिल विषयांची विषयपत्रिका व मागील सभेच्या इतिवृत्ताची प्रत सभेच्या पूर्वी निदान पाच दिवस अगोदर सचिवाने समिती सदस्यांकडे पाठविली पाहिजे.अशा सभा, अध्यक्षांच्या  लेखी सूचनांनुसार समितीच्या सचिवाने बोलावल्या पाहिजेत.मागणी करूनही अशा सभा बोलविण्याच्या कामी अध्यक्षाकडुन टाळाटाळ  होत असेल, तर सभा बोलविण्यासंबंधी समितीच्या बहुमताने दिलेला लेखी आदेश सचिवावर बंधनकारक राहील व सचिवाने अशी सभा आदेश प्राप्तीच्या दिनांकापासुन पंधरा दिवसाचे आत बोलाविली पाहीजे.

(8) अत्यावश्यक व निकडीच्या विषयासाठी कारणे नमुद करुन समीतीची सभा अध्यक्ष व सचिव यांना सर्क्युलेटिंग नोटिसने घेता येईल.अशा सभेचे इतिवृत्त **सचिव संस्था, ग्रामपंचायत व तलाठी यांचे कार्यालयाचे सुचना फलकावर सभेच्या दिनांकापासुन पाच दिवसांचे आत प्रसिध्द करील.**

(9) समीतीचे सर्व कामकाज बहुमताने करण्यात येईल.समीतीच्या सदस्यांचे बहुमताने मतदान हात वर करुन किंवा गुप्तमतदान पध्दतीने घेण्यात येईल. समान मते झाल्यास सदस्य यांची निवड अथवा स्विकृती करणे याखेरीज सर्व कामकाजामध्ये सभाअध्यक्ष यास एक अधिक मताचा (कास्टिंग व्होट) अधिकार राहील.

(10) समीतीच्या सर्व सभा संस्थेचे अध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली होतील.अध्यक्ष यांचे गैरहजेरीत उपअध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली होतील.अध्यक्ष व उपअध्यक्ष यांचे गैरहजेरीत उपस्थित सदस्य सभेसाठी अध्यक्ष म्हणुन आपल्यापैकी एका सदस्याची निवड करतील व अशा निवडलेले सदस्य यांना सभा अध्यक्षाचे सर्व अधिकार असतील.

(11) समीती सभेच्या इतिवृत्तामध्ये उपस्थित सदस्यांची नावे व स्वाक्षरी नोंदविण्यात येईल तसेच सभेस अनुपस्थित असलेल्या सदस्यांची नावे व त्यासमोर 'अनुपस्थित ' वा पुर्वपरवानगीने गैरहजर असल्यास 'रजेवर' असा शेरा नोंदविण्यात येईल.

(12) समीती सभेच्या कामकाजामध्ये मतदान झाले असल्यास इतिवृत्तामध्ये विषयाचे बाजुने व विरोधात झालेले मतदान सदस्यांच्या नावानिशी नोंदविण्यात येईल.

तसेच सभेस हजर असलेल्या कोणत्याही सदस्याला समितीचा कोणताही ठराव किंवा निर्णय मान्य नसल्यास त्याचेविरुध्द मत त्याच्या कारणासह सभेच्या इतिवृत्तामध्ये नोंद करण्यात येईल. विरुध्द मत असलेला सदस्य आपले विरुध्द मत

**त्याच्या कारणासह निबंधकाला अशा सभेच्या दिनांकापासुन पंधरा दिवसांचे आत लेखी कळविल.**

13) संस्थेच्या नोंदणीनंतर पहिल्या सर्वसाधारण सभेमध्ये प्रवर्तक समितीची निवड अधिनियमातील तरतुदीनुसार करण्यात येईल. अशा समितीची मुदत अधिनियमातील तरतुदीनुसार असेल.

**(14) अधिनियमाचे** कलम 73 गक मधील तरतुदीन्वयेची विहीत केलेली अपात्रता समितीस लागू राहील.

**(15) योग्य कारण दाखविल्यावाचून समितीच्या लागोपाठ तीन सभांना एखादा सदस्य गैरहजर राहिल्यास असा सदस्य,समिती सदस्य म्हणुन चालु राहण्यास अपात्र ठरेल.अशा सदस्यास पदावरुन काढुन टाकणेबाबत समीती यथोचितरीत्या निबंधकास कळविल.**

**(16) समिती** सदस्याचा व्यक्तिश: हितसंबंध असणा-या बाबींचा विचार चालू असताना त्याला समितीच्या सभेत हजर राहता येणार नाही अगर तीत भाग घेता येणार नाही.

**(17) अधिनियम,** नियम व संस्थेचे उपविधी यातील तरतुदी व सर्वसाधारण सभांनी वेळोवळी केलेले ठराव यानुसार संस्थेचे काम चालविण्याचा समितीस पूर्ण अधिकार राहील परंतु आयत्यावेळेचे विषयामध्ये आर्थिक बाबी अथवा धोरणात्मक निर्णय बाबत कामकाज करता येणार नाही.

**(18) संस्थेच्या** कामाकरिता समितीच्या आवश्यक तितक्या सभा भरविल्या जातील परंतु दरमहा निदान एकतरी सभा बोलविली जाईल.

**(19) समितीची** कामे खाली प्रमाणे असतील-

1) सदस्य होण्यासाठी व भागासाठी आलेल्या अर्जांचा निकाल लावणे.

2) कर्जे काढणे, ठेवी स्वीकारणे व त्यांच अटीं ठरविणे.

3) भागांच्या, कर्जाच्या व इतर येणा-या रकमांचा वसूल घेणे व आलेला वसूल कशा रीतीने जमा करावयाचा ते ठरविणे.

4) कर्ज मागणीच्या अर्जाचा विचार करणे.

5) कर्ज अगर पत (क्रेडिट) देणे किंवा नाकारणे, ते द्यावयाचे असल्यास कोणत्याही कामाकरीता व किती मुदतीपर्यंत व कोणत्या तारणावर द्यावयाचे ते अधिनियम कलम 44 व नियम 42 व 43 मधील तरतुदी विचारात घेवुन ठरविणे.

6) विवक्षित क्षेत्रापुरत्या अगर विवक्षित कामाकरीता उपसमित्या नेमणे.

7) कर्जाच्या रकमांचा विनियोगावर देखरेख ठेवणे.

8) थकलेले कर्ज वसूल करण्याची तजवीज करणे, कर्ज थकवून अगर अन्य रीतीने उपविधीचे उल्लंघन केल्याबद्दल सदस्यावर कशारीतीने व कोणती कारवाई करावयाची ते ठरविणे.

9) तहकुबी मिळविण्याकरिता आलेल्या अर्जाचा विचार करणे.

10) संस्थेच्या कामासंबंधी आलेल्या अर्जांचा विचार करणे.

11) हिशेब वेळच्या वेळी सचिवाकडून लिहून घेणे ते तपासणे व रोजची शिल्लक मोजून पहाणे. संस्थेच्या हिशेबपुस्तकाप्रमाणे दिसूण येणारी रोख शिल्लक निदान पंधरा दिवसांतून एकदा तपासून पाहाण्याचा व इतर मालमत्ता निदान महिन्यातून एकदा तपासून पाहण्याचा आणि अशा तपासणीचा निष्कर्ष

तपासणीनंतर लगेच व्यवस्थापक समितीचे सदस्यांचा सभेस सादर करण्याचा अधिकार समितीच्या एका सदस्यास त्याच्या नावाने दिला जाईल. जर रोख शिल्लकेत अगर मालमत्तेत काही तूट असल्याचे आढळून आले तर,व्यवस्थापक समिती ती तूट वसूल करण्याकरिता ताबडतोब उपाययोजना करील. या कामी कसूर झाल्यास व्यवस्थापक समितीचे सभासद सामुदायिकरित्या (एकत्रित) व व्यक्तीश: अशा तुटीची भरपाई करण्यास जबाबदार राहतील.

12) समिती , **अधिनियम कलम 75 व नियम 61मधील तरतुदीनुसार आर्थिक वर्ष संपल्यानंतर कलम 79 मध्ये नमुद केलेली खालील विवरणपत्रे नोंदणी अधिकारी यांचेकडे पाठविल -**

**अ) संस्थेच्या कार्याची माहिती देणारा वार्षिक अहवाल**

**ब) लेखापरीक्षण अहवाल**

**क) नफा वाटणी**

**ड) उपविधी दुरुस्ती असल्यास**

**इ) वार्षिक सभेची तारीख व निवडणुक असल्यास त्याची तारीख**

**ई) निबंधकाने कायदा/नियम/उपविधी अनुसार विचारलेली इतर माहिती**

**फ) लेखापरीक्षकाची नेमणूक व त्याची संमती**

13) नेमलेल्या सेवकांचा पगार,भत्ते,सेवा विषयक बाबींवर वाषिर्क सभेत निर्णय घेणे.

14) आपल्या सदस्यांचा गरजा अजमावून बी-बियाणे, खते, धान्य चारा व शेतीविषयक औद्योगिक अगर घरगुती कामांसाठी लागणा-या जिन्नसा खरेदी

करण्याची तजवीन करणे व जरूर पडल्यास मागणी करणा-या व्यक्तीच्या खर्चाने व त्यांच्या जोखमीवर तो साठविण्याची व वाटण्याची तजवीज करणे.

15) उपविधी क्रमांक 4 प्रमाणे कामे हाती घेणे व त्याकरिता भांडवल उभारणे.

16) मालाचे नोंदबुक तपासणे व शिल्लक माल बरोबर आहे किंवा नाही ते पहाणे.

17) संस्था वापरीत असलेली हत्यारे, यंत्रे इत्यादी तपासणे.

**18) संस्थेच्या कचेरीसाठी व माल साठविण्यासाठी जागा संपादन करणे अगर भाडयाने घेणे. संस्थेची माल साठविण्याची जागा व संस्थेचा माल यांचे आगीपासून नुकसान होऊ नये म्हणून बाजारदराने विमा कंपनीमध्ये विमा उतरविण्याची व्यवस्था करणे. विक्रीकरिता माल स्वीकारणे व आवश्यक आणि शक्य असेल तर, त्याची प्रतवारी करण्याची तजवीज करणे व कोणत्या मालाच तारणावर कर्जे द्यावयाची ते ठरविणे.**

**19) उधारीने माल विकण्याची जोखीम संस्थेने घ्यावयाची असेल तेव्हा, ज्यांच्यामार्फत व ज्यांना माल विकावयाचा अशा विश्वासू दलालांची व व्यापा-यांची यादी, अधिनियम कलम 44 व नियम 42 व 46 (बी) मधील तरतुदींना अधीन राहून तयार करणे व त्याची पत ठरविणे.**

**20) ज्या चिटणीस व इतर सेवकांचा रोकडीशी, मालाशी, महत्वाच्या कागदपत्रांशी अगर** रोख्यांशी संबंध येत असेल अशांच्याकडून नियम 107 (बी) मध्ये ठरविलेल्या रकमेच्या प्रकाराच्या प्रमाणानुसार तारण घेणे अथवा प्रचलीत कायद्यातील तरतुदीनुसार आवश्यक ती तजवीज करणे.

**21) लेखापरीक्षा अहवाल विचारात घेणे, अधिनियम कलम 82 व नियम 73 मधील तरतुदींनुसार लेखादोषदुरूस्ती प्रतिवृत्त नियमांच्या ओ नमुन्यात नोंदणी अधिकारी यांच्याकडे पाठविणे आणि लेखादोषदुरूस्ती प्रतिवृत्त पुढील सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे.**

22) **भाग (शेअर्स ), सरकारी व इतर रोखे यांच्यावर संस्थेच्या वतीने शेरा लिहिणे, ते विकणे अगर वर्ग करणे अथवा न करणे आणि त्याकरिता समितीच्या दोन अथवा अधिक सदस्यांना जरूर ते अधिकार देणे.**

23) **सर्वसाधारणपणे संस्थेचा व्यवहार चालविणे.**

24) **वारसाच्या अर्जावर निर्णय , भाग हस्तांतरण अर्जावर व मयत वारस नेमणूकांबाबत निर्णय घेणे.**

25) **एन.पी.ए.बाबत तरतूदी तपासून त्यावर कार्यवाही करणे.**

26) **समिती सदस्यांना वरील काम पार पाडण्याच्या कामी हयगय केल्यास, हयगयीमुळे होणा-या संस्थेच्या नुकसानीस त्यांना वैयक्तिक व सांघिक रीतीने जबाबदार धरले जाईल.**

27) **संस्थेचे अध्यक्ष व सचिव हे तालुका कृषि समन्वय समितीचे सभांना उपस्थित राहतील. सदरच्या सभेतील निर्णयाची आवश्यक ती अमलबजावणी करतील.**

28) संस्थेने ठेवावयाच्या नोंदवहया व कागदपत्रे ही नियम 65 नुसार असतील.तसेच सहकार आयुक्त कार्यालयाचे परिपत्रकानुसार **समान लेखा पध्दती** प्रमाणे **(CAS)** नोंदवहया ठेवणे.

29) संघिय संस्थेच्या निवडणूक प्रसंगी संस्थेच्या संचालक मंडळाच्या ठरावाद्वारे संस्था समिती सदस्यांपैकी अथवा संस्थेच्या क्रियाशिल सभासदांपैकी एका सदस्याचे नाव प्रतिनिधी म्हणून पाठविण्यासाठी ठराव पारित करील.

**9-अ . अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची कार्ये**

समितीच्या सहाय्याने अधिनियम,नियम व उपविधी तरतुदीनुसार संस्थेचे सर्वसाधारण कामकाजावर देखरेख ठेवणे,सेवकावर सर्वसाधारणपणे पर्यवेक्षण करणे व नियंत्रण ठेवणे,व्यवस्थापक समितीच्या सर्व सभांचे अध्यक्ष म्हणुन काम करणे. सर्वसाधारणपणे

संस्थेच्या वतीने करावयाचे अथवा संस्थेच्या विरुध्द दाखल झालेले संविदा, करार, तडजोड,दावे यामध्ये संस्थेची बाजु मांडणे व स्वाक्षरी करणे.सर्व आर्थिक व्यवहार संबंधीत अभिलेख, नोंदवही,विवरणपत्र यावर स्वाक्षरी करणे.अध्यक्ष यांचे गैरहजेरीत उपाध्यक्ष सदरची कार्ये पार पाडील.

## 10. शेती उत्पादन सल्लागार उपसमिती

शेतीउत्पादन सल्लागार उपसमिती ही प्रमुख शेतकरी सदस्यांची व शेतीतज्ञांची असेल व तिची नियुक्ती समितीकडून केली जाईल. प्रत्येक शेतकरी सदस्याची शेती उत्पादन वाढविण्याचे योजना आखून पिकांचा कार्यक्रम तयार करणे, त्यास लागणा-या साधनांचा तपशील पुरविणे, शेती उत्पादनावर देखरेख ठेवणे व सदस्यांना या कामकरिता लागणा-या पतीची साधारणसभेकडे शिफारस करणे ही सदर उपसमितीची कामे राहतील.

## 11. सचिव व त्याची कार्ये

सचिव हा संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहणारा मुख्य कर्मचारी असेल.सचिव समितीच्या नियंत्रणाखाली व अधिनियम,नियम व उपविधी तरतुदीनुसार सर्व कामकाज पार पाडेल. समितीस अधिनियम,नियम व उपविधी तरतुदीनुसार कामकाज करण्यासाठी तो मार्गदर्शक म्हणुन कार्ये पार पाडील.सचिवाची **कामे खालीलप्रमाणे असतील -**

**(1) संस्थेतील सेवकांना कामाच्या दिशा दाखविणे त्यांच्या कामकाजाचा आढावा घेणे व कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवणे.**

**(2) संस्थेचे दप्तर अद्ययावत ठेवणे.**

**(3) संस्थेच्या साधारण सभा व समितीच्या सभा बोलविणे व त्यांना हजर राहणे.**

(4) अशा सभांत होणा-या कामाची नोद वृत्तांत पुस्तकात करणे,

(5) नाबार्ड व सहकार खात्याने विहीत केलेल्या नमुन्यात एम.आय.एस. व इतर माहिती तयार करणे व विहीत मुदतीत संबंधितांना सादर करणे.

(6) संस्थेचे अंदाजपत्रक तयार करुन सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेसाठी ठेवणे.

(7) समितीच्या हुकूमाने पैसा खर्च करणे व येतील त्या रकमा घेवुन जमा करणे.

(8) नियम क्रमांक 65 मध्ये नमूद केलेली संस्थेचे सर्व पुस्तके व हिशोब वेळोवेळी लिहून ठेवणे.

(9) जमा पावत्या, खर्चाच्या पावत्या (व्हौचर्स) व संस्थेचे काम चालविण्याकरिता लागणारी इतर सर्व कागदपत्रे तयार करणे.

(10) नाबार्ड व सहकार खात्याने विहीत केलेल्या सामायिक लेखापध्दतीचा अवलंब करुन संस्थेचे लेख व दफतर ठेवणे व सर्व माहितीचे संगणकीकरणे करणे.

(11) नियम क्रमांक 61 व 62 प्रमाणे वाषिर्क ताळेबंद पत्रके ठरलेल्या मुदतीच्या आत तयार करून ती समितीपुढे ठेवणे व कायद्यातील / नियमातील तरतुदीनुसार विहीत केलेली विवरणपत्रे ठरलेल्या मुदतीच्या आत ती निबंधक यांचेकडे विहीत मुदतीत पाठविण्याची व्यवस्था करणे.

(12) संस्थेचे पत्रव्यवहार चालविणे व सदस्यांना लागणारी जरूर ती माहिती पुरविणे.

(13) लेखा परिक्षण अहवाल आल्यानंतर ताबडतोब ती विचाराकरिता समितीपुढे ठेवणे व तिच्यात दाखविलेले दोष व चुका, दुरूस्त करण्याबाबत जरूर ती तजवीन करणे व नियम क्रमांक 72 प्रमाणे दोषदुरूस्ती प्रतिवृत्त ठरलेल्या मुदतीच्या आत, समितीपुढे ठेवून ते पुढे पाठविण्याची व्यवस्था करणे.

(14) कर्जदार व ठेवीदार यांनी संस्थेशी केलेल्या व्यवहाराची पासबुके कलम 32 (3) मधील तरतुदीप्रमाणे वेळच्या वेळी भरून त्यांना देणे.

**(15)** संस्थेतर्फे दिल्या जाणा-या जमेच्या पावत्यावर सहया केल्या पाहिजेत. भागांचे दाखले, दस्तऐवज व इतर महत्वाचे कागदपत्र यावर चिटणीस व समितीचा एक अधिकृत सदस्य त्या दोघांनी सहया करून दिल्या पाहिजेत.

**17)** समान लेखा पध्दतीनुसार (CAS) नोंदवहया ठेवणे तसेच सभासद रजिस्टर आय नमुना,भाग नोंदणी पुस्तके,ऋणपत्रे व रोखे यांचे नोंदणी पुस्तक,वार्षिक साधारण वृत्तांत बुक,समिती सभा वृत्तांत बुक, रोकड वही (बँक बुक) सामान खाते वही आणि व्यक्तीगत खाते सहया, साठयाचे नोंदणी पुस्तक(स्टॉक बुक), मालमत्ता नोंदणी पुस्तक (डेडस्टॉक व प्रॉपर्टी रजिस्टर) इ.लेखा परिक्षण अहवाल व दोष दुरुस्ती अहवाल,राज्य सरकार कोणत्याही संस्थांसाठी किंवा संस्थांच्या वर्गासाठी विशेष किंवा सामान्य आदेशाद्वारे वेळोवेळी निर्दिष्ट करील असे इतर हिशोब आणि पुस्तके अद्यावत ठेवण्यची जबाबदारी सचिवांची राहिल.

**18)** वसुलीच्या पावत्या संचालक मंडळाच्या मासिक सभेपुढे सादर करुन त्यास मंजुरी घेतली जाईल.

**19)** संस्थेच्या पगारी सेवकांना कामाच्या दिशा दाखवणे त्यांच्यावर देखरेख ठेवणे व त्याचे नियंत्रण करणे.

**20)** संस्थे तर्फे दिल्या जाणा-या जमेच्या पावत्यावर सचिवाने सहया केल्या पाहिजेत. भागाचे दाखले,दस्त ऐवज इतर महत्वाचे कागद पत्रे यावर सचिव व समितीचे अध्यक्ष किंवा एक सदस्य दोघांनी सहया करुन दिल्या पाहिजेत.

**21)** **सचिवाने संस्थेचे कार्यालय सकाळी ---------- ते ----------- पर्यत चालु ठेवले पाहिजे. सचिवास आठवड्यात एक दिवस सुट्टी घेता येईल. मात्र ही सुटटी साप्ताहीक बाजारचा दिवस असणार नाही. कार्यालयाची वेळ संपर्कासाठी सचिवाचा व अध्यक्षांचा पत्ता व दुरध्वनी क्रमांक संस्थेच्या दर्शनी भागात लावण्याची जबाबदारी सचिवाची आहे.**

22) नियम क्र.57 मधील तरतुदीनुसार संस्थेच्या एखादया करारात,व्यवहारात खरेदी केलेल्या अगर विकलेल्या मिळकतीत सचिवाला कसलाही भाग अगर हितसंबंध ठेवता येणार नाही.

## 12. शेतीच्या व नेहमीच्या गरजा भागविण्याकरता द्यावयाचे कर्ज

(1) संस्थेने द्यावयाच्या सर्व प्रकारच्या कर्जाचे व्यवहार अधिनियम कलम 44 आणि नियम क्रमांक 42, 43, व 45, 46,47 यातील तरतुदींना अधीन राहून केले जातील. संस्थेच्या सदस्यांनाच फक्त कर्जे दिली जातील. अशी कर्जे शक्यतो बँकेवर धनादेश (चेक) काढून दिली जातील.

(2) **संस्थेकडून** एखाद्या कामासाठी एक हजार रूपयापेक्षा जादा रक्कम देण्यात येईल तेव्हा, ती धनादेश (चेक) द्वारेच दिली जाईल.

(3) संस्थेच्या सर्व खातेदार सभासद ते संस्थेचे कर्जदार असोत अगर नसोत त्या सर्व खातेदारांची कर्जाची गरज लक्षात घेवुन कर्जाचे कमाल मर्यादा पत्रक तयार करणे आवश्यक आहे.

(4) **बँक** कर्जाच्या थकबाकीत संस्था असली तरी, कर्जदार सभासदाने कर्जाची संपूर्ण रक्कम भरली असेल तर, त्याला संस्थेने पुढील वर्षासाठी कर्ज देण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे. कर्जविषयक धोरण ठरविण्याचा अधिकार व वैयक्तिक कर्जाशी संबंधीत प्रश्न याबाबतीत संस्थेला निर्णय घेता येईल. आरबीआय च्या मार्गदर्शक तत्वांशी अनूसरुन निर्णय, धोरणाचा संस्था अंगीकार करेल.

(5) **इतर** उपविधीत काहीही नमूद केले असेल तरी 20 कलमी कार्यक्रमाचे अंमल बजावणीचे अनुषंगाने दुर्बल घटकातील सभासदांना कर्ज पुरवठा करता येईल व त्याकरिता वेळोवेळी नियम करता येतील व त्यात जरूरीप्रमाणे बदल करता येईल.

(6) आपणास किती कर्ज, कशाकरिता, किती मुदतीपर्यंत व कोणत्या तारणावर पाहिजे हे प्रत्येक अर्जदाराने कर्जासाठी करावयाच्या अर्जात नमूद केले पाहिजे. जमीन असल्यास व पूर्वप्रतिज्ञा (इकरार) पत्र करून दिले नसल्यास ते अर्जाबरोबर पाठविले पाहिजे. अशा अर्जाचा योग्य तो निर्णय समितीने केला पाहिजे. मात्र ठरविलेल्या पतीच्या आतील कर्ज सदस्यांने मागणी केल्याबरोबर संस्थेचे सभापती किंवा समितीचा एक सदस्य व चिटणीस यांना त्यांच्या अधिकारात बँकेवर धनादेश देता येतील व त्यांच्या नोंदी कामकाजाच्या नोदबुकात केल्या जातील. याकरिता समितीच्या सभेच्या मंजूरीची जरूरी नाही.

(7) एखाद्या सदस्यास जरूरीच्या प्रसंगी मंजूर झालेल्या मर्यादेपेक्षा जास्त कर्ज काढून समितीला देता येईल. मात्र हे दिलेले जास्त र्कज्ा त्या सदस्याच्या मंजूर झालेल्या पतीच्या 25 टक्क्यांहून व वरील उपविधी मध्ये ठरविलेल्या वैयक्तिक कर्ज मर्यादेपेक्षा जास्त असणार नाही व त्यामुळे संस्थेची मंजूर झालेली एकूण कमाल मर्यादा उल्लंघिली जाणार नाही. मात्र संस्थेकडे मुदतीची ठेव ठेवणा-या सदस्यास जरूरीच्या प्रसंगी त्या ठेवीच्या तारणााावर ठेव रक्कमेच्या शे.90 टक्क्यांपर्यंत र्कज्ा देता येईल. ते हंगामापूर्वी वसूल न झाल्यास शेतीच्या हंगामात वसूल केले जाईल. जो सदस्य आपल्या कर्जाच्या दुप्पट किंमतीचा माल सहकारी संस्थेमार्फत विक्री करेल त्याला वरील उपविधी मध्ये ठरविलेल्या वैयक्तिक कर्जमर्यादेपेक्षा 10 टक्क्यांपर्यंत जादा कर्ज मिळण्याची सवलत राहील.

**(8)** **सदर** उपविधी मध्ये काहीही नमूद केले असले तरी, सदस्याने आपल्या कर्जासाठी तारण म्हणून स्वत:च्या अगर खंडकरी या नात्याने त्यांचा हितसंबंध असलेल्या जमिनीचे अधिनियम व नियम क्रमांक 48 मधील तरतुदीनुसार विहित नमुन्यात प्रतिज्ञापत्र करून दिले पाहिजे.

अ) एखाद्या सदस्य कर्जदाराने घेतलेले कर्ज फेडल्यांनतर पूर्वीच्या प्रतिज्ञापत्र (इकरार) वर पुन्हा कर्ज देता येईल. त्यासाठी पुन्हा नवे प्रतिज्ञापत्र करून घेण्याची जरूरी नाही.

ब) कर्ज घेण्यापूर्वी त्या सदस्याने आपण दुस-या संस्थेतून कर्ज घेतले नसल्याची खात्री करून दिली पाहिजे. व नियम क्र.45 प्रमाणे के नमुन्यात प्रतिज्ञापत्र लिहून दिले पाहिजे. त्या कर्ज मंजूर करण्यापूर्वी संस्थेने जरूर ती चौकशी केली पाहिजे.

**(10)** **सदस्याचा** अर्ज मंजूर करण्यापूर्वी खालील प्रकारचे तारण करून घेण्यात येईल.

अ) स्थावर मिळकतीवर तारण गहाणाचा बोजा निर्माण करून आणि पिके तारण गहाण घेवुन.

ब) स्थावर मिळकतीचे व पिकांचे तारण अपुरे वाटल्यास एक अगर दोन लायक इसम जामीन घेवुन.

क) उपविधी क्रमांक 12(8) मध्ये नमूद केल्याप्रमाणे जमिनीचे इकरार पत्र करून घेवुन.

ड) ठराविक मुदतीची वचन चिठ्ठी (प्रॉमिसरी नोट) जमीन नसलेल्या कर्जदाराच्या बाबतीत मूळ कर्जास तारण म्हणून अगर जमीन असलेल्यांच्या बाबतीत जादा तारण म्हणून घेवुन.

इ) जमीनी व्यतीरीक्त इतर स्थावर मिळकती उदा. घर, प्लॉट तारण देऊन.

**(11)** **अल्प/मध्यम** मुदतीच्या दिलेल्या कर्जाच्या परतफेडीची तारीख ही संबधित वित्तीय पुरवठा करणाऱ्या बँकेच्या (जिमस/राष्ट्रीयीकृत/ग्रामीण इत्यादी) कर्ज धोरणाप्रमाणे असेल.

**(12)** कमाल मर्यादा मंजूर केल्यानंतर सदस्यांच्या गरजांनुसार कर्जाचे वाटप केले जाईल.

**(13)** **शेतीविषयक** औद्योगिक व घरगुती कामाकरिता लागणा-या जिन्नसा खरेदी करण्याकरिता द्यावयाची कर्जे ही संस्थेमार्फत पुरविल्या जाणा-या त्या त्या मालाचे स्वरुपात सभासदांच्या इच्छेनुसार दिली जाईल.

**(14)** संस्थेमार्फत तालुक्याच्या कृषीबाजार संस्थेमार्फत अगर संस्था सुचवेल त्या अभिकर्त्या (दलाल मार्फ त आपल्या मालाची विक्री करण्याची जबाबदारी प्रत्येक सदस्याने कर्ज घेताना पत्करली पाहिजे व विक्रीच्या रकमेतून संस्थेच्या कर्जापोटी परस्पर रकमा कापून घेवून त्या संस्थेकडे देण्याविषयीचा लेखा अधिकार त्यांने संस्थेस दिला पाहिजे. त्यानुसार त्याच्या मालविक्रीच्या रकमेतून त्याच्याकडील येणे असलेले कर्ज कापून घेण्याचा अधिकार समितीस राहील.

**(15)** **संस्थेच्या सर्वसाधारण सभेच्या  पूर्व संमंतीने** व त्यांनी घातलेल्या अटींना अनुसरून एकात्मिक योजनेखाली अगर प्रकल्पासाठी एखाद्या क्षेत्रास  बँकेने पुनर्विर्त मंजूर केल्यास आपल्या सभासदांनाअल्प व दीर्घ मुदतीचा कर्ज पुरवठा सभासदांच्या मागणीप्रमाणे करणे.

**(16)** **व्याजाचे** दर ठरविण्याचे अधिकार संस्थेला आरबीआय च्या धोरणाशी सुसंगत ठरविता येतील.

**(17)** सभासदास ज्या कारणासाठी कर्ज दिले आहे त्याच कारणासाठी त्याचा विनियोग करणे आवश्यक आहे. अन्यथा सदरची संपुर्ण रक्कम परत मागण्याचा अधिकार संस्थेस राहील.

**(18)** कर्जदाराच्या स्वत:च्या कोणत्याही चुकीवर अवलंबून नसलेल्या अशा योग्य कारणामुळे कर्जदाराला कर्जफेड करता येणे मुळीच शक्य नाही अशी समितीची खात्री झाल्यास व त्याने तहकुबी मिळण्याकरिता अर्ज केल्यास फक्त एक वर्षापर्यंत त्याकर्जाची मुदत वाढविण्याचा समितीला अधिकार आहे. संस्थेने केंद्रीय बँकेचे देणे असेल तर, तिच्या मंजुरीने संस्थेच्या साधारण सभेला 1 वर्षावरील मुदत देता येईल. अर्जाला जामिनदार असल्यास त्याच्या लेखी संमतीशिवाय कोणतीही मुदत वाढवून दिली जाणार नाही.

**(19)** कर्जफेडीच्या मुदत संपल्यानंतर कर्जाची वसूल न आल्यास व कर्जास तहकुबी दिली नसल्यास मूळ कर्जदार व त्याचा जामिनदार (जामिनदार घेतलेले असल्यास) हयांना कर्ज वसुलीची नोटीस देण्यात येईल. नोटीशीत नमूद केलेल्या मुदतीत रक्कम भरलीच पाहिज असा आदेश नोटीशीत दिला जाईल. सदर मुदतीत समाधानकारक वसूल न झाल्यास त्या कर्जदारावर लवाद दावा दाखल केला जाईल लवादाने कर्जदाराविरूध्द हुकुमनामा दिल्यानंतर समाधानकारक वसूल झाला नसल्यास अगर याकरीता मूदत दिली नसल्यास, तो हुकूमनामा ताबडतोब बजावणीस पाठविला पाहिजे तो पाठविण्याची जबाबदारी समितीवर राहील.अपिलात मिळालेल्या निवाडयाचे बजावणीबाबत याप्रमाणे कारवाई केली जाईल.

## 13. शेतीच्या व इतर मालाच्या तारणावर द्यावयाचे कर्ज

**खालील अटींवर शेतीच्या व इतर मालाच्या तारणावर कर्जे देता येतील.**

1) **शेतीच्या अगर इतर मालाच्या तारणावर त्यांच्या चालू बाजार भावाने होणा-या किंमतीच्या शे.75 टक्के पर्यंत रकमा कर्ज म्हणुन देता येईल.**

2) **संस्थेने पसंत केलेल्या कोठारात अगर इमारतीत प्रत्यक्ष माल आणून ठेवल्याखेरीज तो माल संस्थेच्या ताब्यात संपूर्णपणे आल्याखेरीज कर्जाची रक्कम आदा केली जाणार नाही.**

3) **तारण मालाच्या योग्य बाजारभावाने होणा-या रकमेचा विमा कर्जदाराच्या खर्चाने उतरविता येईल**

4) **कर्ज रकमेची मुदत जास्तीत जास्त 6 महिन्यांपर्यंत असेल व ती मुदत योग्य अशा अटीवर आणखी 3 महिन्यांपर्यंत वाढविता येईल.**

5) **अशा कर्जावरील व्याजाचा योग्य तो दर ठरवून अशा व्यवहाराबद्दल केलेल्या इतर खर्चाचा समावेश या खर्चात केला जाणार नाही.**

6) **मालाचे नुकसान अगर नासधुशीबाबत संस्था जबाबदार राहणार नाही. परंतु मालाची नासधूस होणार नाही अशा रीतीने तो ठेवण्याची काळजी घेतली जाईल.**

7) **सदस्यांकडुन कर्जाच्या अगर इतर येणे रकमांच्या परतफेडीकरिता तारण मालाची विक्रीची संपूर्ण अगर अंशत: रक्कम कपात करण्यास पात्र राहील.**

8) **वरील अटी व समितीने पसंत केलेल्या इतर अटी नमूद करून प्रत्येक कर्जदाराने कर्जाकरिता करारनामा लिहून दिला पाहिजे.**

9) कोठाराची व्यवस्था व त्याच्या व्यवहाराचे हिशेब ठेवण्याकरिता कोठार कारकुनाची नेमणूक केली जाईल व त्याच्यावर चिटणीसाचे नियंत्रण राहील. कोठाराच्याव्यवहाराकरिता स्वतंत्र कारकून नेमला नसल्यास त्या व्यवहाराची जबाबदारी चिटणीसावर राहील.

10) उपविधीत इतर काहीही नमुद असले तरी महाराष्ट्र शासनाचे विशेष घटक योजना व डॉ.पंजाबराव देशमुख व्याज अनुदान योजनेच्या अनुषंगाने आवश्यक ती माहिती

सचिव शासकीय यंत्रणेकडे सादर करेल आणि अथवा महाराष्ट्र शासन/केंद्र शासन यांनी जाहीर केलेल्या योजने संबंधीची माहिती सादर करेल.

11) एकात्मिक योजनेखाली अगर प्रकल्पासाठी एखाद्या क्षेत्रास वित्तीय संस्थेने पुनर्वित मंजुर केल्यास आपल्या सभासदांना निरनिराळया कारण/योजनसाठी भू विकास बँकेप्रमाणे दीर्घ मुदतीचा कर्ज पुरवठा सभासदांच्या मागणी प्रमाणे करणे.

## 14. ठेवी

**(1)** **संस्थेस** बचत (सेव्हिंग्ज) ठेवी सदस्यांकडून स्वीकारता येईल.

बचत ठेवीचे व्यवहार खालील अटींवर केले जातील.

1. एका वेळी ठेवल्या जाणा-या ठेवीची रक्कम 100/- रू.पेक्षा कमी असणार नाही.
2. कोणत्याही ठेवीदारास आठवडयातुन दोन पेक्षा अधिक वेळा बचत खात्यातुन रक्कम काढता येणार नाही.
3. कोणत्याही ठेवीदारास एका वेळी 100/- रू.पेक्षा कमी अगर 5000/-रुपये पेक्षा जास्त रक्कम काढता येणार नाही.
4. पासबुक हजर केल्याशिवाय कोणतीही ठेव परत केली जाणार नाही. पास बुकात नमुद न केलेल्या कोणत्याही रक्कमे बददल संस्था जबाबदार राहाणार नाही.

5. ठेवीचे खाते सूरु करताना ठेवीदारास पास बुक देण्यात येईल. ते संपुर्ण भरल्यावर दुसरे पासबुक देण्यात येईल. पासबुक गहाळ झाल्यास फीदाखल दहा रुपये दिल्याशिवाय नवीन पासबुक दिले जाणार नाही.

6. प्रत्येक इंग्रजी महिन्याच्या 10 तारखेपासून शेवटच्या तारखेपर्यत ठेवीदाराच्या नांवावर असलेल्या कमीत कमी रकमेवर व्याज आकारले जाईल.वर्ष अखेर ठेवीवर जमा होणारे व्याज त्या ठेवीदाराच्या खात्यात जमा केले जाईल.

7. ठेवीचे खाते सूरु करताना ठेवीदाराने ठराविक नमुन्यात अर्ज केला पाहिजे व आपल्या सहीचा नमुना दिला पाहिजे.रक्कम परत घेताना ठेवीदाराने ठराविक नमुन्यात पावती लिहून दिल्या शिवाय व तिच्यावर आपल्या सहीच्या नमुन्याप्रमाणे सही केल्या शिवाय कोणतीही ठेव परत केली जाणार नाही.

8. संस्थेकडे जमा होणाऱ्या एकूण ठेवी व त्या ठेवींची गुंतवणुक संस्थेने,नाबार्ड व रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार केली पाहिजे.

**(2)** **सहा** महिन्यांहून कमी मुदतीच्या नाहीत अशा ठेवीही संस्थेस स्विकारता येतील.उपविधी क्रंमाक 5 मधील तरतुदी अशा ठेवीनांही लागु असतील. मात्र अशा ठेवीचा व्याजाचा दर जिमस बँकांच्या व्याजदराशी सुसंगत असेल. मुदतीपुर्वी ठेव परत केली जाणार नाही.अत्यंत निकडीच्या परिस्थितीची ठेवीदाराने खात्री करुन दिल्यास समितीच्या मर्जीनुसार ठेव परत करता येईल. तिच्यावर किमान बचत ठेवीवरील व्याज दराप्रमाणे व्याज दिले जाईल.

(3) **ठेवी** खात्रीने वेळच्या वेळी परत करता याव्यात यासाठी तात्काळ पैसा (प्ल्यूइड रिसोर्सेस) हाती यावा अशा त-हेने नियम क्रमांक 41 मधील तरतुदींना अधीन राहून आपल्या भांडवलाची गुंतवणुक केली पाहीजे.

(4) शासनाने ठेवी संरक्षण विमा योजना लागू केल्यास सदर योजनेत संस्था सामील होईल.

## 15. शिल्लक

संस्थेच्या समितीच्या ठरावाच्या मंजुरीने पैशाची देवघेव चिटणिस करेल.त्या ठरावाच्या मंजुरीने चिटणिसाकडे संस्थेचे रु.500/-पर्यंतची शिल्लक ठेवता येईल त्यापेक्षा जास्त शिल्लक जमली असल्यास जमल्यापासून 3 दिवसाच्या आत ती (सुट्टीचे दिवस सोडून) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 70 प्रमाणे बॅंकेत अगर तिच्या जवळच्या शाखेत भरली पाहीजे.

## 16. हिशोब व कागदपत्रे

(1) **संस्थेची** हिशोब व पुस्तके ही नियम 65 मधील तरतूदीनुसार व नाबार्डने विहित केलेल्या नमुन्यात व **समान लेखा पध्दतीनुसार (CAS)** ठेवण्यात येतील..

(2) **नियम** क्रमांक 65 मध्येनमूद केलेली मा.सहकार आयुक्त व निबंधक यांनी ठरविलेली समितीला आवश्यक वाटतील आशी पुस्तके व कागदपत्रे संस्थेने ठेवली पाहीजेत.त्या पुस्तकावर व कागदपत्रांवर जरूर तेथे व किर्दीवर दररोजच्या व्यवहाराच्या शेवटी सभापतीने व चिटणीसाने सहया केल्या पाहीजेत.किर्दीवर त्यांनी सहया न केल्यास संस्थेला त्यांच्या विरूध्द जरूर ती उपाययोजना करता येईल.सभापती व चिटनिस यांनी संस्थेच्या कागदपत्राच्या प्रमाणित नकलांवर सहया केल्या पाहीजेत.या व्यतिरीक्त दुस-या अधिका-यांनी कागदपत्रावर सहया करावयाच्या असल्यास त्या करण्यासाठी संस्थेस त्यांना अधिकार देता येईल.

(3) **संस्थेचे** रोखे,हिशोबाची पुस्तके,दस्तऐवज व कागदपत्र चिटणिसाच्या ताब्यात राहतील व ती सांभाळण्याची जबाबदारी चिटणीसावर राहील.

(4) **आलेल्या** ठेवींच्या, कर्जफेडीच्या व इतर रक्कमांच्या ठराविक नमुण्यातील जमेच्या पावत्या चिटणिसाने सहया करून दिल्या पाहीजेत.

(5) **कलम** 32 अ प्रमाणे सदस्यास पासबुक देण्यात येईल.त्यात सदस्याने फेडलेल्या त्यास दिलेल्या रक्कमा,कर्जाच्या झालेल्या व्यवहाराच्या तारखा.व्याजाचा दर मुददल व व्याज,येणे रक्कम व नियमांत सांगितल्या प्रमाणे इतर तपशील यांच्या नोंदी केल्या जातील व त्या प्रत्येक नोंदीच्या खरेपणाबद्दल चिटणीसाने सही केली पाहीजे,त्याने सदस्यांची पासबुके नेहमी लिहून पूर्ण केलेली पाहीजेत.एखाद्या सभासदास चेक भरून देण्याकरीता ते जरुरीनुसार संस्थकडे ठेवण्यात येईल तेव्हा, त्याची पोहोच सदर सदस्यास चिटणीसाकडून देण्यात येईल.

(6) **संस्थेच्या** कोणत्याही सदस्यास अधिनियम कलम क्रमांक 32 मधील तरतुदीनुसार त्यांच्या नकला त्यास देता येतील.

## 17.संस्थेच्या व्यवहाराचे संगणकीकरण

संस्थेने आपल्या व्यवहाराचे संगणकीकरण करुन घेणे आवश्यक राहील.

## 18. गा-हाणी,समझोता व तक्रार निवारण समिती

अधिनियमाचे कलम 89 अब अन्वये गा-हाणी,समझोता व तक्रार निवारण समिती असेल.सदर समीती रचना,अधिकार व कार्ये कलम 89 अब मध्ये नमुद केलेनुसार असेल.

1) संस्थेचा सचिव वा व्यवस्थापक समितीने प्राधिकृत केलेला सेवक सदर समितीचा सदस्य सचिव म्हणुन कामकाज पाहील.सदर सदस्य सचिव गा-हाणे स्विकारणे,समझोता मसुदा स्विकारणे,बैठकीची सुचना काढणे,गा-हाणी,अंतीम समझोता करार तयार करणे,समझोता व तक्रार निवारण समिती कामकाजाचे अभिलेख सांभाळणे,कामकाजाचा अहवाल व्यवस्थापक समिती व सदस्यांच्या साधारण सभेस सादर करणे.

2) सदर समितीच्या अध्यक्षांचे आदेशावरुन सदस्य सचिव, अध्यक्ष यांचे स्वाक्षरीने आवश्यकतेनुसार समितीची बैठक बोलाविल परंतु किमान दर तीन महिन्यातुन एक तरी बैठक बोलाविण्यात येईल.सभेच्या सुचनेसोबत सभेत करावयाचे कामकाजाचा समावेश असलेल्या अर्जांचा संक्षिप्त तपशिल दर्शविणारी विषयसुची जोडलेली असेल.

3) समितीचे किमान दोन सदस्य हजर असले म्हणजे गणपुर्ती होईल परंतु गा-हाणे समझोता करार अंतीम करणे ,सुनावणी करणे व  अंतीम निकाल करणे यासाठी अध्यक्ष व एक सदस्य यांची उपस्थिती अनिवार्य राहील.

संस्थेच्या सभासदांमधील  तसेच सभासद व संस्थेमधील वाद , तक्रारी सोडविण्यासाठी  संस्था स्तरावर वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये तक्रार निवारण समितीची नेमणुक करण्यात येईल.

तक्रार निवारण समितीची रचना खालीलप्रमाणे असेल-

1) सदर समिती त्रिसदस्यीय राहील (क्रियाशिल सभासदांमधुन). यातील एक व्यक्तीही अध्यक्ष व अन्य दोन व्यक्ती समितीचे सदस्य म्हणुन काम करतील.

समितीचे अध्यक्ष हे संस्थेचे वरिष्ठ सभासद व संस्थेच्या कामकाजाचे ज्ञान असलेले असावे. तसेच  समितीचे उर्वरित दोन सदस्य हे सहकारातले तज्ञ असावेत किंवा जिल्हा बँकेच्या कामकाजाबाबत अनुभवी सभासद असावा.

2) संस्थेचा एक वरीष्ठ अधिकारी/सचिव, समितीचा सदस्य सचिव म्हणुन काम पाहील व समितीच्या कामकाजाची नोंद ठेवण्याचे काम तो करेल.

समितीचा कालावधी नियुक्तीपासून 1 वर्षाचा अथवा पुढील वार्षिक सर्वसाधारण सभेपर्यंत राहील.

कार्यव्याप्ती:-सदर समिती संस्थेच्या सभासदांमधील किंवा सभासद व संस्थेमधील व्यवसायासंदर्भात व व्यवस्थापना संदर्भातील वाद किंवा तक्रारी यांचे निवारण करेल. प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संबधितास सुनावणी देऊन व संबधितांचे म्हणणे ऐकून घेऊन तीन महिन्यांच्या आत तक्रारींचे निराकरण करणे आवश्यक राहील. सदर समितीची कर्तव्य म्हणजे त्यांच्यासमोर आलेल्या वादामध्ये संस्थेस योग्य तो सल्ला देण्याबरोबरच कायदा/नियम, संस्थेचे उपविधी व सहकार खात्याचे आदेश व मार्गदर्शक तत्वे तसेच उपविधी व सहकार खात्याचे आदेश व मार्गदर्शक तत्वे तसेच संस्था आणि सहकार क्षेत्रातील रुढी यांचा विचार करुन सभासद व संस्था यांचेमध्ये तडजोड घडवून आणणे. सदर समितीचे इतिवृत्तास संचालक मंडळ सभेस मान्यता घेणे आवश्यक राहील. संचालक मंडळ समितीच्या मान्यतेनंतरच या समितीच्या निर्णयावर अंतिम कार्यवाही होईल.

## 19. सहकार प्रशिक्षण :-

**संस्थेच्या सभासद, संचालक, अधिकारी-कर्मचारी यांना सहकार विषयक आणि संस्थेच्या व्यवहाराविषयक प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रत्येक वर्षी संस्था अशा प्रशिक्षणासाठी आराखडा तयार करेल त्यामध्ये संस्थेचे संचालक, सभासद, अधिकारी-कर्मचारी यांच्या प्रशिक्षणाचा समावेश असेल. सदरच्या प्रशिक्षणापोटी**

**होणाऱ्या खर्चाची तरतुद संस्था तिच्या अर्थसंकल्पामध्ये दरवर्षी करेल. सदरचे प्रशिक्षण हे संघीय संस्था/राज्य शासनाने अधिसुचित केलेली शिखर प्रशिक्षण संस्था/रिझर्व्ह बँक/नाबार्ड/यशदा/वैकुंठ मेहता इन्स्टिटयुट ऑफ को-ऑप. मॅनेजमेंट या संस्थांच्या माध्यमातून घेता येईल.**

## 20. उपविधी लागू होणे

संस्था यापूर्वीच नोंदली असल्यास हे उपविधी मंजूर होवून आल्यानंतर या पूर्वीचे अंमलात असलेले सर्व उपविधी रद्य झालेत असे समजले जाईल.